पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

14 वर्ष वर्धापन दिन

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३२४ ■ बुधवार, दि.३ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.-MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# दिल्लीच्या मालवीय नगरमधील रेस्टॉरंटमध्ये भीषण आग, 21 जणांचा मृत्यू

## अनेक परदेशी नागरिक; ३७ जणांची सुटका, बचावकार्य सुरू

वृत्तसंस्था ३ जून

**नवी दिल्ली** बुधवारी सकाळी दिल्लीतील मालवीय नगर येथील लेमन ग्रीन रेस्तरॉंमध्ये लागलेल्या आगीत २१ जणांचा मृत्यू झाला. ज्या इमारतीला आग लागली ती सहा मजली इमारत असून, पूर्वी त्यात फ्लोरिस स्टे हॉटेल होते. दिल्ली अग्निशमन सेवेनुसार, सकाळी ९:४५ वाजता आगीची माहिती मिळाली. तळघरातून तिघांना वाचवण्यात आले. आतापर्यंत इमारतीमधून सुमारे ३७ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. अनेकांची प्रकृती गंभीर असून, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. अग्निशमन दलाच्या दहा वाहनांनी आग विझवली. बचावकार्य सुरू आहे.

सकाळी ८:५० वाजता इमारतीच्या तळमजल्यावर आग लागली. काच फुटल्याने



आगीच्या ज्वाला तळघरात पसरल्या.रेस्तरॉंच्या तळघरातून बचावलेल्या लोकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मृतांमध्ये मध्य आशिया आणि आफ्रिकेतील परदेशी नागरिकांचा समावेश आहे. दिल्लीतील रेस्तरॉंला लागलेल्या आगीत दुपारी १ वाजेपर्यंत, २१ जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे. मृतांमध्ये मध्य आशिया आणि आफ्रिकेतील अनेक परदेशी नागरिकांचा समावेश आहे.

दिल्ली अग्निशमन सेवेच्या जनसंपर्क अधिकाऱ्याने सांगितले की, ३७ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. मालवीय नगर येथील आगीच्या घटनेवर भाष्य करताना, दिल्ली अग्निशमन सेवेचे जनसंपर्क अधिकारी (पीआरओ) ए. के. मलिक म्हणाले, 'आम्हाला सकाळी ८:५० वाजता आगीबद्दलचा कॉल आला. सकाळी ८:५१ वाजेपर्यंत अग्निशमन दलाच्या गाड्या रवाना करण्यात आल्या. सुरुवातीला आम्ही सात वाहने पाठवली होती, परंतु कॉलची संख्या वाढल्यामुळे आम्ही त्यानुसार वाहने आणि कर्मचाऱ्यांची संख्या वाढवली. आमचे पहिले पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी तात्काळ आग विझवण्याचे आणि बचाव कार्य सुरू केले. आम्ही सुरुवातीला तळघरातून सहा लोकांना बाहेर काढले. आग विझवण्याचे काम सुरू असताना, आम्ही वरच्या मजल्यांवर गेलो आणि तेथूनही मोठ्या संख्येने लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढले.

# शिवणी विमानतळाच्या जमिनीसाठी 190 कोटींची मंजुरी




## ४७३ भूधारक होणार मालामाल, थेट खरेदी नाही भूसंपादन होणार

प्रतिनिधी ३ जून

**अकोला:** अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार १४०० मीटरवरून १८०० मीटर करण्यासाठी अखेर प्रशासकीय आणि वित्तीय मंजुरी मिळाली आहे. मौजे शिवार येथील २२.२४ हेक्टर आर जमीन संपादीत करण्यासाठी १९० कोटींच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. या ठिकाणी सरकारने काढलेल्या रेट नुसार प्रति चौरस फुटाला ३,४२५ रुपये मिळेल किंवा त्या पेक्षा जास्त भाव मिळेल, असा अंदाज वर्तविला जात आहे. ज्यांचे घर, बांधकाम असेल त्यांना स्वतंत्र पैसे मिळतील. तशी तरतुदच करण्यात आली आहे.

राज्य शासनाने शिवनी विमानतळ विस्तारीकरणासाठी थेट खरेदीचा निर्णय रद्द केला आहे. संयुक्त मोजणी अहवालानुसार या क्षेत्रात एकूण ४८६ भूधारक असून, त्याप्ैकी सुमारे ४७२ भूधारक हे अकृषक प्लॉट धारक आहेत. हे सर्व क्षेत्र सध्या अकोला महानगरपालिकेच्या हद्दीत येते. अनेक प्लॉट धारक स्थानिक रहिवासी नसल्याने त्यांच्याशी संपर्क साधणे क्लिष्ट होते. एकानेही नकार दिला तरी संपूर्ण प्रक्रिया रखडण्याची भीती होती. या वेळखाऊ आणि क्लिष्ट प्रक्रियेमुळे विहित मुदतीत काम पूर्ण होणे शक्य नसल्याने, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने थेट खरेदीचा प्रस्ताव रद्द करून 'भूसंपादन कायदा, २०१३' नुसार जमीन संपादित करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. त्यास मान्यता दिली. या निर्णयामुळे गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या अकोला विमानतळ विस्तारीकरणाच्या कामाला आता प्रत्यक्ष गती मिळणार आहे.

# शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून ४२ शहरांसाठी प्रभारींची नियुक्ती

प्रतिनिधी ३ जून

**पुणे :** राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) प्रदेशाध्यक्ष महबूब शेख यांनी राज्यातील विविध शहरांसाठी प्रभारी पदांच्या नव्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. या नियुक्त्यांमधून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने नवे पर्व युवा सर्व असा संदेश दिला आहे.

महबूब शेख यांनी राज्यातील ४२ शहरांसाठी प्रभारी नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. यामध्ये बुलढाणा रमेश पाटील, अकोल्यात ॲड. योगेश नाईक, अमरावीत शहर शुभम नागपूरे, यवतमाळ मकसुद पटेल लोहगावकर, वाशिम डॉ.जिशान खान, संदीप कित्ते (नागपूर), गोरख नलावडे (पुणे), प्रशांत बाबर (कोल्हापूर), सौरभ मिश्रा (भंडारा-गोंदिया), तेजस शिंदे (नवी मुंबई), निळकंठ वडमोरे (छत्रपती संभाजीनगर), प्रमोद सर्वदे (मीरा-भाईंदर), भरत सौंदाणे (नंदुरबार) आणि प्रवीण लोणकर (चंद्रपूर) यांचा समावेश आहे. नियुक्त्यांची घोषणा करताना महबूब शेख यांनी सोशल मीडियावर पोस्टमध्ये शुभेच्छा संदेश दिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि विधिमंडळ पक्षनेते जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी नव्या पदाधिकाऱ्यांनी कार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# खान सरांच्या कोचिंग क्लासवर गोळीबार

**पटना :** बिहारची राजधानी पटना येथील मुसल्लहपूर हाट परिसरात प्रसिद्ध शिक्षक आणि युट्यूबर खान सर यांच्या कोचिंग संस्थेबाहेर मंगळवारी रात्री गोळीबाराची घटना घडली. या घटनेत एका सुरक्षा रक्षकाला दुखापत झाली असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे.

# एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरेंनी चर्चा करावी

प्रतिनिधी ३ जून

**ठाणे :**ठाण्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि छत्रपती संभाजीनगरमधील आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीसंदर्भात चर्चा झाल्याची माहिती एकनाथ शिंदेंनी दिली. तसंच शिवसेना आमदार अब्दुल सत्तार यांना महायुतीचे नियम पाळण्याच्या सूचना दिल्याचं एकनाथ शिंदेंनी सांगितलं. सत्तारांच्या नाराजीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक होणार असल्याचंही शिंदे म्हणालेत. तर एकनाथ शिंदे जे बोलतील तो अंतिम शब्द असल्याचं अब्दुल सत्तार म्हणाले.मोठ्या भावाकडून आमचा पक्ष संपवू पाहत आहे. जिल्ह्यात आमच्याबाबत अनेक घडामोडी घडत आहेत, निधी मिळत नाही आहे. येणाऱ्या निवडणुकांमध्ये आमचं काय होईल हाही प्रश्न आहे.

### अब्दुल सत्तारांची व्यथा खरी

महाराष्ट्रात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधानपरिषदेच्या निवडणुकीत अनेक ठिकाणी बंडखोरी पाहायला मिळाली आहे. महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या शिवसेना आणि भाजपमधील अंतर्गत वाद पुन्हा एकदा या निमित्ताने चव्हाट्यावर आले आहेत. छत्रपती संभाजीनगर-जालना विधानपरिषदेची जागा ही भाजपला सुटल्याने शिवसेना शिंदे गटातून नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच आमदार अब्दुल सत्तार यांनी त्यांच्या मुलाचा म्हणजे समीर सत्तारचा उमेदवारीचा अर्ज बंडखोरी करत दाखल केला आहे. इतकेच नव्हे तर सत्तार यांनी भाजप शिवसेनेला संपवत असल्याचा आरोपही केला होता. अब्दुल सत्तार यांच्या या भूमिकेनंतर शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यासोबत बैठक आयोजित केली होती.

# सरकारची 11 एकर जागा अदानींच्या धारावी पुनर्विकास प्रकल्पाला !

प्रतिनिधी ३ जून

**मुंबई :** गेल्या काही वर्षांपासून रखडलेल्या धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या कामाला सध्या गती दिली जात आहे. या प्रकल्पात बेस्ट उपक्रमाच्या धारावी आगार आणि काळा किल्ला आगाराच्या जागेचाही वापर होणार आहे. या आगारांची जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्प आणि नवभारत मेघा डेव्हलपर्स प्रा.लि. यांना हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव मंगळवारी बेस्ट समितीत मंजूर करण्यात आला. यामध्ये एकूण ११.५८ एकर जागा उपलब्ध केली जाणार असून त्यापैकी २.३५ एकर जागा बेस्ट उपक्रमाची, तर उर्वरित जागा जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारीतील आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पात बेस्टचे धारावी आगार आणि काळा किल्ला आगाराच्या ११.५८ एकर जागेचाही वापर होणार आहे. मात्र यामुळे बस सेवेवर परिणाम होऊ नये आणि सेवा अबाधित राहावी, यासाठी विद्यमान आगारांच्या या दोन भूखंडांपैकी एकूण ६.१७ एकर जागेवर दोन वेगवेगळ्या ठिकाणी, तात्पुरते आगार उभारले जाणार आहेत.

# अखेर महावितरणच्या अभियंत्यावर गुन्हे दाखल

प्रतिनिधी ३ जून

**हिवरखेड :** येथील काळी पिवळी बसस्थानक बाजूला असलेल्या श्री रामकृष्ण वेट ब्रीजवर काही दिवसापूर्वी एका मालवाहक गाडीवर काम करत असताना अचानक त्या युवकाला हाय टेन्शन या विद्युत वाहिनीचा जबर शॉक लागला व त्याचा मृत्यू झाला. या घटनेचा पोलिसांनी तपास केला असता यामध्ये महावितरण कंपनीचे कनिष्ठ अभियंता आशिष भीमराव धांडे, उमेश रमेश जवकार, ट्रॅक चालक राहुल संतोष अस्वार, मृतक ज्ञानेश्वर कैलास गोमासे विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले.

# बीडमध्ये लस्सीने भरलेल्या टाक्या अधिकाऱ्यांनी ओतल्या !

प्रतिनिधी ३ जून

**बीड :** अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे हे मूळ बीड जिल्ह्यातील आहेत. त्यांच्याच या जिल्ह्यामध्ये आता अन्न व औषध प्रशासनाकडून वेगवेगळ्या ठिकाणी धाडी टाकल्या जात आहेत.

बीड शहराजवळ असलेल्या एका लस्सी उत्पादन केंद्रात मुदत बाह्य झालेले अन्नपदार्थ वापरत असल्याचे समोर आले. त्यामुळे या ठिकाणचा १०० लिटर हून अधिकचा लस्सीचा साठा नष्ट करण्यात आला. तसेच या लस्सी उत्पादन केंद्र चालकावर कारवाई करण्यात आली आहे. याबरोबरच माजलगाव शहरात रिफाइंड सोयाबीन तेलाचा साठा जप्त करण्यात आला असून शिरूरमध्ये देखील अशीच कारवाई करण्यात आलीय. तसेच पाटोदा तालुक्यातील दोन दूध संकलन केंद्राची तपासणी करत दुधाचे नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.




# सिटी न्यूज सुपरफास्टच्या दणक्यानंतर प्रशासन हलले !

## महसूल मंत्र्यांच्याच जिल्ह्यात रेती माफियांचा उच्छाद ! पूर्णा नदीतून हजारो ब्रास वाळूची अहोरात्र चोरी

प्रतिनिधी ३ जून

**अकोला /अमरावती :** महसूल मंत्र्यांचे पालकत्व असलेल्या जिल्ह्यातच रेती माफियांनी कायद्याची लक्तरं वेशीवर टांगली आहेत ! पूर्णा नदीच्या पात्रातून हजारो ब्रास वाळूचे दिवसाढवळ्या दरोडे घातले जात असून, नदीचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. पण आता या गुंडगिरीला चाप लागणार आहे. 'सिटी न्यूज सुपरफास्ट'ने या महाघोटाळ्याचा पर्दाफाश करताच, कुंभकर्णी झोपेतून जागे झालेल्या खनिकर्म विभागाने अखेर चौकशी आणि थेट जप्तीचे आदेश काढल्याची माहिती आहे.

अमरावती जिल्हा महसूल मंत्र्यांचा आहे. तर मग वाळूचे दरोडे घालण्याचे धाडस कोणाचे या रॅकेटच्या मागे नेमके कोणते बडे मासे आहेत 'सिटी न्यूज सुपरफास्ट'च्या बातमीमुळे प्रशासनाला जाग तर आली आहे, पण आता केवळ नोटीसबाजी करून चालणार नाही. या रेती चोरांवर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर मोक्काअंतर्गत कडक कारवाई झालीच पाहिजे, हीच जनतेची मागणी आहे. दर्यापूर उपविभागीय अधिकारी राजेश्वर हांडे यावर काय ठोस कारवाई करतात, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.


पूर्णा पात्रातील अवैध रेती उत्खननाचे पुरावे नष्ट करणे सुरु

प्रतिनिधी २ जून

लोतखेड- म्हैसांग परिसरात 1 कोटींच्या रेतीवर दरोडा

दर्यापूर तहसीलदाराचे दुर्लक्ष का ? 'पूर्णा' पात्राची ऐशीतैशी

### जेसीबी, पोकलँड आणि डोंगे होणार जप्त; माफियांचे धाबे दणाणले!

पूर्णा नदीचे काळीज पोखरणाऱ्या या माफियांविरोधात आता थेट कारवाईचे हत्यार उपसले गेले आहे. अवैध उत्खननासाठी वापरले जाणारे डोंगे (बोटी), जेसीबी, पोकलँड आणि हायवा टिप्पर लवकरच जप्त केले जाणार आहेत. अमरावती जिल्हा खनिकर्म अधिकारी प्रणिता चापले यांनी या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत, दर्यापूरचे उपविभागीय अधिकारी राजेश्वर हांडे यांना तातडीने चौकशीचे आदेश दिले आहेत.

### अकोला-अमरावती प्रशासनाची 'संयुक्त मोहीम'

पूर्णा नदी ही अकोला आणि अमरावती जिल्ह्यांच्या सीमेवरून वाहते. याच भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेत रेती माफियांनी धुमाकूळ घातला आहे. करतखेड, म्हैसांग आणि लोतखेड या गावांनजीकच्या नदीपात्रातून अहोरात्र बेकायदेशीर उपसा सुरू आहे. खनिकर्म अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, केवळ कागदी घोडे न नाचवता अकोला आणि अमरावती दोन्ही जिल्ह्यांच्या महसूल अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे घटनास्थळाची पाहणी करावी, असे ही स्पष्ट केले आहे. आता ही संयुक्त पाहणी केव्हा होणार हे मात्र कोडेच आहे. या बेसुमार उपशामुळे नदीचे पर्यावरण कितपत उद्ध्वस्त झाले आहे, याचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सिटी न्यूज अकोला

बुधवार, दि. ३ जून २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## अनोळखी इसमाची ओळख पटविण्याचे आवाहन

**अकोला :** सिटी कोतवाली पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या वर्षा मेडिकल फतेह चौकाजवळ एक अज्ञात इसम बेशुद्धावस्थेत असल्याची माहिती डायल ११२ वर मिळाली. त्यानुसार घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता एक ६५ वर्षीय इसम मरणासन्न अवस्थेत दिसून आला. त्याला सर्वोपचार रूग्णालयात उपचारार्थ दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. याप्रकरणी पोकॉ विशाल सोनवणे यांनी फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार सदर इसमाचे वर्णन रंग सावळा, बांधा मजबूत, उंची ४ फूट ९ इंच, चेहरा गोल, डोक्यावरचे केस वाढलेले काळे-पांढरे, अंगात मळकट पाढऱ्या रंगाचा कुर्ता-पायजाम असून, वय अंदाजे ६५ वर्ष असावे. ह्या इसमाची ओळख पटल्यास संबंधितांनी पोलिस स्टेशन सिटी कोतवालीशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस उपनिरीक्षक संजय जाधव यांनी केले आहे.

# पिंप्री जैनपूर, बेलुरात चक्रीवादळाने केळी उद्ध्वस्त !

## शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी, अकोट तहसीलदारांना निवेदन



प्रतिनिधी ३ जून

**अकोट :** तालुक्यामधील पिंप्रि जैनपूर, बेलुरा, उमरा, मखरमपूर, लाळेगाव, बोर्डी आकोलखेड अशा अनेक बागाईतदार परिसरात केळीचे परिपक्व झालेले कापणीला आलेले पीक सोमवार १ जून सायंकाळी अंदाजे ७ दरम्यान मोठ्या प्रमाणात सोसाट्याचा वारा चक्रीवादळ व अवकाळी पावसाने उद्ध्वस्त झाले. शेतकऱ्याच्या हातात तोंडाशी आलेला घास मातीमोल झाल्याने लाखोचे नुकसान झाले. २० ते ४०किलोपर्यंत परिपक्व झालेले केळीच्या घड सोसाट्याच्या वाऱ्याने झाडे संपूर्ण केळीचे बन हे जमीनदस्त झाले. शेती पेरणीच्या ऐन तोंडावर शेतकऱ्याचा निसर्गाने घाला केला आहे. यावेळी अंदाजे २०० ते ३०० एकर बागायतदार केळीचे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानाचे तात्काळ सरसकट पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकरी वर्गाकडून जोर धरत आहे. तसेच शेतकऱ्यांनी याबाबत अकोट तहसीलदारांना निवेदन देत नुकसान भरपाईची मागणी केली आहे.



बेलुरा येथील शंकर काळे, हर्षल मंगळे, नंदकिशोर ढोले, गजानन लोखंडे, विठ्ठल मंगळे, अर्जुन ढोले, सोपान ढोले, नंदकिशोर मंगळे, लक्ष्मण सोळंके, गोपाल मंगळे, गजानन कोकाटे, सिंधुबाई पखाण, श्रीकृष्ण पखाण, साहेबराव भगत, गणेश बोचे, आत्माराम जवंजाळ, अनिल रावणकर, नरेश पखाण, ज्ञानेश्वर ढोले, बजरंग भगत, भास्कर सोळंके, सुशील खवले, राजेश गोळे ,भास्कर वसु, श्रीकांत फुलारी, सोपान पखाण, बोर्डीचे अक्षय आतकड, मनोज सोळंके, ऋषी लोणकर सह प्रमोद दांडगे पटवारी व अक्षय पाचकोर कृषी सहाय्यक शेतकरी बांधावर पोचले शेतकऱ्यांनी अकोट तहसीलदार येथे तक्रार निवेदन सादर केले आहे, शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तरी सर्व शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी शेतकरी वर्गातून मागणी होत आहे.

माझ्या शेतातील साडेतीन हजार केळीचे खोळ कापणीला आले होते पैकी एक जूनला अवकाळी पाऊस चक्रीवादळाने पूर्ण शेत जमीनदोष झाले अंदाजे ७ लाख रुपयाचे नुकसान झाले नुकसानाची सरसगड मला भरपूर देण्यात यावी,

**ज्ञानेश्वर ढोले**
बेलुरा शेतकरी,

१ जून अवकाळी पाऊस चक्रीवादळाने गावातील १७० एकर केळीची कापणीला आलेली शेती पूर्णता जमीन दोस्त झाली मुख्यमंत्री कृषी विभाग प्रशासनाने नुकसान भरपाई द्यावी,

**साहेबराव भगत**
पिंप्रि जैनपूर, शेतकरी

## पावसाळा पाहता शहरात तात्काळ 'आपत्तीकक्ष' सुरू करा

### माजी नगरसेवक गिरीश जोशी यांची मनपा प्रशासनाकडे मागणी

प्रतिनिधी ३ जून

**अकोला :** पावसाळा तोंडावर आला असताना शहरात संभाव्य दुर्घटना आणि अपघातांची संख्या वाढण्याची भीती लक्षात घेता, शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी महानगरपालिकेने तात्काळ 'आपत्तीकक्ष' स्थापन करावा, अशी मागणी माजी नगरसेवक गिरीश जोशी यांनी मनपा प्रशासनाकडे केली आहे.

पावसाळ्याच्या दिवसांत विविध कारणांमुळे अपघात घडण्याची शक्यता असते. अशा बिकट परिस्थितीत



नागरिकांना प्रशासनाकडून त्वरित आणि वेळेत मदत मिळणे अपेक्षित असते. लोकांच्या जीवाला सर्वोच्च महत्त्व देणे ही प्रशासनाची प्राथमिकता असायला हवी, असे जोशी यांनी आपल्या मागणीत म्हटले आहे.

पावसाळ्यात झाडे पडणे, जलमय स्थिती निर्माण होणे किंवा रस्ते अपघात यांसारख्या घटना घडतात. अशा वेळी मदतीसाठी एक खंबीर यंत्रणा तैनात असणे आवश्यक आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी मनपा प्रशासनाने स्वतःहून पुढे येऊन चोवीस तास कार्यरत असणारा नियंत्रण कक्ष सुरू करावा. शिकस्त इमारतींची शहरातील संख्या पाहता त्यातील रहिवाशांना खाली करण्याची गरज आहे.

अन्यथा मोठा अपघात होण्याची भिती व्यक्त केली गेली आहे. माजी नगरसेवक गिरीश जोशी यांच्या या मागणीनंतर आता महापालिका प्रशासन पावसाळ्यापूर्वी शहरात आपत्ती व्यवस्थापनासाठी काय पावले उचलते, याकडे अकोलेकरांचे लक्ष लागले आहे. पावसाळ्यात नेहमीच शहरवासीयांचे तारांबळ उडत असते, शहरातील बहुतांश रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने शहरवासीयांना या पाण्यातूनच मार्ग काढावा लागतो.

## वायर चोरी प्रकरणातील आरोपीस अटक

### आरोपीकडून १ लाखाचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ३ जून

**अकोला :** शहरातील काँग्रेस नगर घोडदौड रोड अकोला येथील बांधकामावरील वायरिंग कट करून चोरून नेली. अशी तक्रार आकाश अरूण दामोदर (सुपरवायझर) यांनी १ जून रोजी दिली होती. या प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली असून त्याच्याकडून १ लाख ५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

फिर्यादी आकाश दामोदर यांनी दिलेल्या खदान पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार, ११ मे रोजी एस. एस डेव्हलोपर काँग्रेस नगर घोड दोड रोड अकोला बांधकाम साईटवरील फ्लॅट मधील वायरींग कट करून चोरी करून नेले आहे. यामध्ये अंदाजे २० हजार रूपये किमतीची वायर चोरी करून नेले आहे. या तक्रारी वरून पोस्टे खदान ११०५/२०२६ कलम ३३१ (४), ३०५ भा. न्या.स. प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात घेतला आहे.

सदर गुन्हयाचे तपासात आरोपी व मोपेड वाहणाचा शोध



घेणे कामी तपास पथक रवाना करून पोस्टे खदान परीसरातील सीसीटीव्ही फुटेज ची पाहणी करून अज्ञात आरोपीचा शोध घेवून सदर वाहन चोरी मधील आरोपी विक्रम अजय राजगुरू, वय १९ वर्षे, रा. वेदनंदीनी कान्हेरी सरप, अकोला ओम सावन तायडे वय १९ वर्षे, रा. आंबेडकर नगर नवीन बस स्टैंड मागे अकोला, प्रज्वल कैलास तायडे वय १९ वर्ष रा. धनेगाव बाळापुर ह.मु. यशवंत नगर वाशीम बायपास अकोला, आदीत्य राजु डोमाळे वय १९ वर्षे रा. नायगाव मिलन नगर अकोला यांनी चोरी केल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपींना तपास कामी ताब्यात घेऊन चौकशी केली असता सदर आरोपी याने पोस्टे खदान हददीतील वायर चोरी केल्याची कबुली दिली. आरोपी याचे ताब्यातून गुन्हयात वापरलेली बिना नंबर प्लेट असलेली बजाज कं. पलसर मोटार सायकल कि. अं ९० हजार रूपये, नगदी १५ हजार असा एकुण १ लाख ५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा उघड करण्यात आला आहे. ही कारवाई मनोज केदारे, पोलीस निरीक्षक पोस्टे खदान, पोहेकॉ निलेश खंडारे, पोहेका अमित दुबे, पोहेकॉ भुषण मोरे, पोहेकॉ अभिमन्यु सदांशिव, पोकॉ वैभव कस्तुरे पोलीस स्टेशन खदान अकोला यांनी केली.

## गांधीग्राम येथे पूर्णा घाटाची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

### ऑगस्ट महिन्यात साजऱ्या होणाऱ्या कावड उत्सवाची तयारी



प्रतिनिधी २ जून

**अकोला :** अकोला तालुक्यातील गांधीग्राम येथील पूर्णा नदीवरील घाटाची आवश्यक दुरूस्ती, तसेच स्वच्छताकामे करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज दिले. आज जिल्हाधिकारी यांनी गांधीग्राम येथे पूर्णा घाटाची पाहणी केली.

ऑगस्ट महिन्यामध्ये साजरा होणाऱ्या कावड उत्सवाच्या निमित्ताने जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी गांधीग्राम येथील कावड घाट परिसराची पाहणी केली. या वेळी पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, महापालिका आयुक्त सुनील लहाने, उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील, राजेश भारती, ॲड पप्पू मोरवाल आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी वर्षा मीना म्हणाल्या की, कावड उत्सवानिमित्त गांधीग्राम येथील पूर्णा नदीच्या घाटावर पुरेशी वीज व्यवस्था, स्वच्छता करावी. घाटावरील तुटलेले हौद त्वरित दुरुस्त करावे. भाविकांना पूर्णेचे पाणी कावडीत सुरक्षितपणे घेण्यासाठी पुरेशा खोलीपर्यंत पायऱ्या असाव्यात. आवश्यक त्या ठिकाणी रॅम्प व्यवस्था करावी. ही कार्यवाही एका महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले. घाट परिसरात वाहनतळ व आवश्यक सुविधा उभारण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## शासकीय आयटीआय अकोला येथे प्रवेश प्रक्रिया सुरू; तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### अधिकाधिक संख्येने मुला-मुलींनी प्रवेश अर्ज दाखल करावे - प्राचार्य संतोष साळुंके

**अकोला :** स्थानिक रतनलाल प्लॉट स्थित सम्राट चंद्रगुप्त मौर्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला झाला आहे.




अतिशय कमी खर्चात अनेक दशकांपासून कौशल्य प्रदान करून रोजगार आणि स्वयंरोजगार अत्यंत यशस्वी अशी शासकीय योजना असलेल्या आयटीआयच्या प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला असून प्रवेश अर्ज दाखल करणे आणि व्यवसाय निवड याबाबतची प्रक्रिया प्रारंभ झाली आहे. स्थानिक रतनलाल प्लॉट स्थित सम्राट चंद्रगुप्त मौर्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आयटीआय येथे अभियांत्रिकी तथा बिगर अभियांत्रिकी व्यवसायांना बहुसंख्य मुला-मुलींनी नाना विविध व्यवसायांना प्रवेश घेऊन आपले भविष्य उज्वल करावे असे आवाहन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी तथा प्राचार्य आयटीआय अकोला संतोष साळुंके यांनी केले आहे. संस्थेचे प्रसिद्धी प्रमुख अरविंद पोहरकर यांनी दिलेल्या माहितीनुसार या वर्षी प्रवेश उत्सुक उमेदवार याला आधार कार्ड वरील नोंदी नुसार admission.dvet.gov.in या संकेत स्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज भरून तो आयटीयआय येथे आवश्यक ती कागदपत्रे दाखवून अर्ज निश्चित करावा.

संस्थेचे प्रवेश प्रमुख विनोद पायघन यांनी या वर्षी संस्थेत अल्पसंख्यांक प्रवर्गातील उमेदवारांकरिता खास राखीव असलेल्या ६ व्यवसायांना तसेच इतर २२ सार्वत्रिक अभियांत्रिकी तसेच बिगर अभियांत्रिकी व्यवसायांच्या एकूण ८८८ या वर्षी प्रवेश दिल्या जाणार आहेत. विविध कौशल्य देणाऱ्या व्यवसाया बाबत सविस्तर माहिती पत्रक संस्थेत उपलब्ध असल्याचे पायघन यांनी सांगितले. अधिक माहिती करता संस्थेमध्ये दररोज सकाळी १०ते ११ या कालावधीमध्ये मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. विविध व्यवसायांची आणि त्यांची माहिती त्या माध्यमातून इच्छुक उमेदवार यांना दिल्या जाते .

प्राचार्य संतोष साळुंके यांनी या शासकीय संधीचा सर्वांनी लाभ घ्यावा तसेच प्रशिक्षण कार्यक्रमालावधी दरम्यान आणि नंतर असलेल्या विविध रोजगार व स्वयंरोजगार तसेच इतर मिळणाऱ्या राज्य शासनाच्या विविध योजणांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

## जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता!

**अकोला :** जिल्ह्यात २ जून ते ५ जूनपर्यंत काही ठिकाणी विजाच्या कडकडासह पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे.

यादरम्यान ताशी ४० ते ५० किमी प्रतितास याप्रमाणे हवेचा वेग राहण्याची शक्यता आहे. अशावेळी आवश्यक ते कारण असल्याशिवाय घराबाहेर पडू नका, जनावरांना झाडांना किंवा विजेच्या तारेच्या खाली बांधू नका. विज, वारा व पावसापासून बचावाकरीता सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्यात यावा. अशास्थितीत झाडाखाली आश्रय घेऊ नये.

पाऊस व विजाच्या स्थितीत मोबाईल फोनचा उपयोग टाळावा. शेतकऱ्यांनी आपला शेतमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा.

## १० एकरातील केळी पीक जमीनदोस्त!

### शेतकऱ्याचे लाखो रूपयांचे नुकसान

प्रतिनिधी ३ जून

**अकोला :** जिल्ह्यात जूनच्या सुरूवातीलाच जोराच्या वाऱ्यासह तुफान पाऊस झाला होता. याचा सर्वाधिक फटका फळबागांना बसला असून, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यात अनेक भागातील केळी पीक जमीनदोस्त झाल्याने शेतकऱ्यांचे लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे.


जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील हिंगणा येथील अमोल नळकांडे या शेतकऱ्याने मोठ्या मेहनतीने १० एकरावर केळी बाग फुलविली होतीरु मात्र सोमवारी आलेल्या जोरदार वादळी पावसामुळे हे संपूर्ण जमीनवर लोळल्याने



मातीमोल झाले आहे. घडासह केळीचे झाडे जमीनीवर पडून मोठे नुकसान झाले आहे. तयार व्हायला आलेली केळी अक्षरश: मातीमोल झाली.. नळकांडे या शेतकऱ्याचं लाखोंचं नुकसान झालंय. याशिवाय अकोट, तेल्हारा तालुक्यात जोराच्या वाऱ्यासह पावसामुळे येथील केळी उत्पादक शेतकऱ्यांचे देखील अतोनात नुकसान झाले. ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहत होते, या वाऱ्यामुळं केळी उत्पादक शेतकऱ्यांना फटका बसला आहे.

## मोटेगावकर यांची अकोल्यातील बेनामी संपत्ती आणि पुरावे परस्पर दुसरी कडे हलवल्याचा आरोप

### वंचित बहुजन युवा आघाडीची पोलिसात तक्रार



प्रतिनिधी २ जून

**अकोला :** देशातील नीट पेपर फूट प्रकरणातील आरोपी मोटेगावकर ह्याची अकोला येथील तोष्णीवाल लेआउट परिसरातील आर.सी.सी. मोटेगावकर क्लासचे साहित्य आणि रेकॉर्ड परस्पर दुसरी कडे शिफ्ट करण्यात आल्याचे विरुद्ध वंचित बहुजन युवा आघाडी आणि महिला आघाडीने थेट पोलिस तक्रार दाखल करण्यात आली.

मोटेगावकर विरुद्ध सर्वोच्च तपास संस्था तपास करीत असून पेपर फूट, बेनामी संपत्ती आणि विद्यार्थी रेकॉर्ड परस्पर गायब करून आरोपीला सहकार्य करणाऱ्या सर्वांना सहआरोपी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मोटेगावकर विरोधात विविध गुन्हे दाखल असून, कथित बेनामी संपत्ती तसेच नीट घोटाळ्याशी संबंधित बाबींचा तपास केंद्रीय यंत्रणांकडून सुरू असताना, क्लासची संपत्ती, संगणक, शैक्षणिक साहित्य तसेच विद्यार्थ्यांच्या नोंदी परस्पर इतर इमारतींमध्ये हलविण्यात येत आहेत. यामुळे संभाव्य पुरावे नष्ट करण्याचा किंवा तपासात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे.

तसेच मुख्य आरोपीला सहकार्य केल्याचा आरोप त्याचे सहकाऱ्यांवर करण्यात आला असून, सिव्हिल लाईन पोलिसांनी दोन वेळा नोटीस बजावूनही संबंधितांकडून राजरोस दुसऱ्या इमारतीत शिफ्ट करण्यात आले असल्याचे दिसून आले. दरम्यान, क्लासमध्ये प्रवेशासाठी भरलेली फी परत मिळत नसल्याची तक्रार काही पालकांनी वंचित कडे केली असता. वैष्णवी पारधी आणि राधिका माहुरी यांनी कार्यालयात जाऊन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता कार्यालय उपलब्ध नसल्याचा दावा त्यांनी केला.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

बुधवार, दि. ३ जून २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# धान्य व मोटार पंप चोरणाऱ्या सहा आरोपी जेरबंद

प्रतिनिधी ३ जून



**दारव्हा :** तरनोळी येथील तूर चोरी प्रकरणाचा छडा लावत दारव्हा पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सहा आरोपींना अटक केली आहे. तपासादरम्यान आरोपींनी तालुक्यातील विविध भागांतील मोटार पंप व केबल चोरीच्या गुन्ह्यांचीही कबुली दिल्याने अनेक प्रकरणांचा उलगडा झाला आहे. या कारवाईत सुमारे २.७४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तरनोळी येथील अरविंद आनंदराव कदम (७२) यांनी २९ मे रोजी दारव्हा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. घरात जागा नसल्याने त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोरील सभागृहातील एका खोलीत १५ क्विंटल तूर साठवून ठेवली होती. अज्ञात चोरट्यांनी खिडकीचे लोखंडी गज कापून २६ कट्टे तूर, सुमारे ८४ हजार ५०० रुपयांचा माल, टप्प्याटप्प्याने चोरून नेला होता.

गुन्ह्याच्या तपासासाठी विशेष पथक नियुक्त करण्यात आले. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी अमित पंजाबराव बरडे (रा. तरनोळी) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने रवि बरडे, रोशन जामनिक आणि तीन अल्पवयीन साथीदारांच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींनी चोरी केलेली तूर विक्री केल्याचेही उघड झाले. पोलिसांनी आरोपींकडून ८४ हजार ५०० रुपयांचे तुरीचे कट्टे, गुन्ह्यात वापरण्यात आलेली मारुती कंपनीची चारचाकी आणि एक ऑटो रिक्षा असा एकूण २ लाख ७४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

दरम्यान, पोलीस कोठडीत असताना आरोपींनी भोपापूर, रामगाव रामेश्वर आणि बरबडी शिवारातील मोटार पंप व केबल चोरीच्या घटनांची कबुली दिली. अभिलेखांची पडताळणी केल्यानंतर संबंधित गुन्हे दारव्हा पोलीस ठाण्यात दाखल असल्याचे स्पष्ट झाले. चोरीचा माल विक्रीतून मिळालेली ४४ हजार ५०० रुपयांची रक्कमही पोलिसांनी जप्त केली आहे.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धार्थ भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चव्हरे, ठाणेदार सुनील गोपीनवार तसेच दारव्हा व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली.

# 'आम्ही वनवासी नाही, आदिवासी आहोत'; अमित शहा यांच्या वक्तव्याचा निषेध

प्रतिनिधी ३ जून



**यवतमाळ :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आदिवासी समाजासाठी केलेल्या 'वनवासी' या शब्दप्रयोगाचा निषेध करत अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, नवी दिल्लीच्या यवतमाळ जिल्हा शाखेने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निवेदन सादर केले.

परिषदेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य नरेश गेडाम यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ नुसार देशातील आदिवासी समाज हा अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट आहे. त्यामुळे आदिवासी समाजाला 'वनवासी' म्हणून संबोधणे चुकीचे असून त्यामुळे समाजाच्या भावना दुखावल्या जात आहेत.

आदिवासी समाजाला 'वनवासी' म्हणून संबोधण्यामागील भूमिका स्पष्ट करावी, अन्यथा या वक्तव्याबाबत देशातील आदिवासी समाजाची माफी मागावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. आदिवासी समाजाची ओळख, इतिहास आणि घटनात्मक मान्यता यांचा आदर राखणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या मागणीसाठी नरेश गेडाम यांच्या नेतृत्वाखाली प्रदीप कुमरे, मधुकर मडावी, भास्कर करपते, देविचंद मेश्राम, निळकंठ कुळसंगे, सुरेश मेश्राम, निळकंठ तोडसाम, मेजर जीवन कोवे यांच्यासह आदिवासी विकास परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर केले.

# दिग्रसमध्ये १४ जूनला मोफत आरोग्य शिबिर

प्रतिनिधी ३ जून

**दिग्रस :** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त दिग्रस येथे 'आरोग्य संकल्प अभियान' अंतर्गत भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. 'रुग्णसेवा हिच ईश्वरसेवा' या संकल्पनेवर आधारित हे शिबिर १४ जून रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत दिनबाई विद्यालय येथे होणार आहे.

मा. आरोग्य सेवा समिती, यवतमाळ यांच्या पुढाकारातून दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था, सावंगी (मेघे) तसेच आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात विविध आजारांची मोफत तपासणी, उपचार, शस्त्रक्रियांसाठी मार्गदर्शन आणि औषधांचे वाटप करण्यात येणार आहे. हृदयविकार, कर्करोग, स्त्रीरोग, बालरोग, त्वचारोग, अस्थिरोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा विकार, श्वसनरोग, मानसिक आजार, न्यूरो विकार, दंत व मुखरोग तसेच मूत्ररोग यांसारख्या आजारांसाठी तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी केली जाणार आहे. महिलांसाठी मेमोग्राफीद्वारे स्तन कर्करोग तपासणी, पॅप स्मिअर चाचणी, बंध्यत्व तपासणी, व्हेरिकोज वेन्स तपासणी, किडनी तपासणी आणि ईसीजीसह विविध आरोग्य चाचण्यांची सुविधाही उपलब्ध राहणार आहे.

तपासणीनंतर आवश्यकतेनुसार रुग्णांना पुढील उपचार, शस्त्रक्रिया आणि विशेष वैद्यकीय सेवांसाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. अनेक उपचार आयुष्मान भारत योजनेअंतर्गत उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली असून शिबिरस्थळी आयुष्मान भारत कार्ड नोंदणीची सुविधाही असेल. त्यासाठी नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड आणि आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. दिग्रस, दरव्हा आणि नेर विधानसभा मतदारसंघांतील गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी हे शिबिर उपयुक्त ठरणार असल्याने जास्तीत जास्त नागरिकांनी या आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. आरोग्य सेवा ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

# विकासकामांबाबत गैरसमज नको : नगराध्यक्षा प्रियदर्शिनी उईके

प्रतिनिधी ३ जून



शहरातील अनेक भागांत रस्ते खोदाईची कामे सुरू असल्याने

**यवतमाळ :** शहरातील विविध भागांत सुरू असलेल्या भुयारी गटार, पाणीपुरवठा आणि इतर पायाभूत सुविधांच्या विकासकामांबाबत नागरिकांनी कोणताही गैरसमज करून घेऊ नये, असे आवाहन नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शिनी अशोक उईके यांनी केले आहे.

सध्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी) यांच्या माध्यमातून ही कामे सुरू असून शहराच्या दीर्घकालीन विकासासाठी ती महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नागरिकांना काही प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. मात्र, भविष्यात अधिक सक्षम भुयारी गटार व्यवस्था, सुधारित पाणीपुरवठा आणि दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी ही कामे आवश्यक असल्याचे नगराध्यक्षा उईके यांनी सांगितले. प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले की, या प्रकल्पांचे नियोजन, मंजुरी, अंमलबजावणी तसेच तांत्रिक देखरेख ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अखत्यारित येते. त्यामुळे रस्ते खोदाई, कामांचा वेग किंवा अन्य तांत्रिक बाबींमध्ये यवतमाळ नगर परिषदेचा थेट हस्तक्षेप अथवा निर्णयाधिकार नाही.

कामांबाबत नागरिकांच्या काही तक्रारी अथवा शंका असतील, तर त्यांनी संबंधित विभागातील अभियंत्यांशी थेट संपर्क साधावा. नागरिकांच्या सहकार्यामुळे ही विकासकामे वेळेत पूर्ण होऊन शहराला आधुनिक पायाभूत सुविधांचा लाभ मिळेल, असा विश्वासही नगराध्यक्षा उईके यांनी व्यक्त केला.

यवतमाळ शहरातील विविध भागांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने स्वतंत्र अभियंते नियुक्त केले असून संबंधित भागातील नागरिकांनी तक्रारी अथवा अडचणींसाठी त्यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# यवतमाळ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी सात मतदान केंद्र

प्रतिनिधी ३ जून

**यवतमाळ :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या यवतमाळ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी जिल्ह्यात एकूण सात मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. त्यामध्ये यवतमाळ, वणी, केळापूर, राळेगाव, दारव्हा, पुसद आणि उमरखेड येथील तहसील कार्यालयांमध्ये मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे.

मतदान केंद्रांमध्ये यवतमाळ, आर्णी व बाभुळगाव येथील मतदारांना यवतमाळ तहसील कार्यालय येथील मतदान केंद्रावर मतदान करावे लागणार आहे. वणी व मारेगाव येथील मतदारांना वणी तहसील कार्यालय, पांढरकवडा, झरी-जामणी व घाटंजी येथील मतदारांना केळापूर तहसील कार्यालय, राळेगाव व कळंब येथील मतदारांना राळेगाव तहसील कार्यालय, दारव्हा व नेर येथील मतदारांना दारव्हा तहसील कार्यालय, पुसद व दिग्रस येथील मतदारांना पुसद तहसील कार्यालय, उमरखेड, महागाव व ढाणकी येथील मतदारांना उमरखेड तहसील कार्यालय येथील मतदान केंद्रांत मतदान करावे लागणार आहे.

निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हा निवडणूक प्रशासनाने अधिकाऱ्यांना दिल्या असून मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी तयारी करण्यात येत आहे. येत्या 12 जून रोजी निवडणूक प्रक्रियेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही दिले जाणार आहे.

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन

प्रतिनिधी ३ जून



**यवतमाळ :** वडगाव मार्ग येथील श्रीसंत गजानन महाराज मंदिरात मंदिर समिती, गजानन महाराज ज्येष्ठ नागरिक संघ व सामुदायिक प्रार्थना मंडळाद्वारे पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या ३०१ वी जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीरामचंद्र जिवतोडे, उपाध्यक्ष मंदिर समिती यांनी अहिल्याबाईच्या प्रतिमेला हारार्पण केले. प्रास्ताविकेत सामुदायिक प्रार्थनेचे उपासक घनश्याम तायडे म्हणाले राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी ७० वर्षांच्या कालावधीत मातेला सुखापेक्षा दु:खच भोगावे लागले. त्यांचे पती खंडेराव यांचे लढाईत निधन झाल्यावर त्या सती जाणार होत्या, परंतू त्यांचे सासरे होळकर घराण्याचे संस्थापक मल्हारराव होळकर यांनी त्यांना सती जाऊ दिले नाही.

त्यानंतर त्यांनी अनेक दु:खाचा सामना करत एक आदर्श राज्यकर्त्या बनल्या. दानशूर, न्यायप्रिय व कुशल प्रशासक होत्या. भारतातील चारधाम १२ ज्योतिर्लिंगासह १२०० मंदिराचा जिर्णोधार व नदीवारघाट, अनेक धर्मशाळा, पाण्याची सोय, अन्नछत्र व जमिनीचा ७/१२ च्या जनक या त्यांच्या कार्याची पावती असल्याचे सांगितले. संचालन व आभार कृष्णराव कांबळे यांनी मानले.

कार्यक्रमासाठी सुधाकर पुराणिक, शशिकांत बोंद्रे, ज्ञानेश्वर सावरकर, पुंडलिक मोतीकर, अविनाश निमकर, सुधाकर डांगोरे, सुभाष मात्रे, भानुदास टेंगे, मुकुंद मालोदे, पंजाब गावंडे, मंगल दारव्हेकर, रामभाऊ काटोलकर, गंगाधर शिरभाते, जीवन ठाकरे, नरोटे, हिवकर, दुरशेट्टीवार, गुल्हाने, झाडे, शशिकला जीवतोडे, तारा कोल्हे, माधुरी दुरशेट्टीवार, कमल कडुकार, उज्ज्वला आदींची उपस्थिती होती.

# पत्रकार अफजल खान यांचा पोलीस प्रशासनाकडून गौरव

प्रतिनिधी ३ जून

**दिग्रस :** दिग्रस येथील ज्येष्ठ पत्रकार तथा समाजसेवक अफजल खान यांचा सामाजिक ऐक्य, समाजसेवा आणि पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल दिग्रस पोलीस प्रशासनाच्या वतीने प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. सहायक पोलीस अधीक्षक तथा पोलीस निरीक्षक डॉ. तेजस सारडा यांच्या स्वाक्षरीने हा सन्मान प्रदान करण्यात आला.

प्रशस्तीपत्रात अफजल खान यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून सत्य, निष्पक्षता आणि समाजहित जपण्याबरोबरच सामाजिक सलोखा व परस्पर विश्वास दृढ करण्यासाठी केलेल्या कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केल्याची दखल पोलीस प्रशासनाने घेतली.

मुस्लिम शिवजयंती उत्सव समिती तसेच 'आम्ही दिग्रसकर' या संघटनांच्या माध्यमातून अफजल खान यांनी सर्वधर्मीय नागरिकांमध्ये संवाद, बंधुभाव आणि सामाजिक सौहार्द निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रमांद्वारे त्यांनी एकात्मता आणि माणुसकीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला. दिग्रस शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच सामाजिक शांतता अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाला वेळोवेळी दिलेल्या सहकार्याचेही यावेळी कौतुक करण्यात आले. संवाद आणि समन्वयाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न सोडविण्याच्या त्यांच्या भूमिकेचा गौरव प्रशस्तीपत्रातून करण्यात आला. या सन्मानामुळे अफजल खान यांच्या सामाजिक कार्याला नवी प्रेरणा मिळाली असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# नगरसेवक कक्षाची दयनीय अवस्था; नगरसेवकांनीच हाती घेतला झाडू

## यवतमाळ नगरपरिषदेच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी ३ जून



**यवतमाळ :** यवतमाळ नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीतील नगरसेवकांसाठी राखीव सभागृहाची अत्यंत दयनीय अवस्था समोर आली आहे. सभागृहात मोठ्या प्रमाणात घाण साचलेली असून अनेक दिवसांपासून साफसफाई करण्यात आली नसल्याचे चित्र पाहणीदरम्यान दिसून आले. तसेच सभागृहाच्या खालच्या भागातून पाणी वाहत असल्याने परिसर अस्वच्छ आणि गैरसोयीचा बनला आहे.

नगरसेवकांनी सभागृहाची पाहणी केल्यानंतर प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा निषेध व्यक्त केला. यावेळी गटनेते तथा नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे आणि नगरसेवक बिपिन चौधरी यांनी स्वतः झाडू हाती घेत सभागृहाची साफसफाई केली. तसेच वाहणाऱ्या पाण्यात कागदाचे प्रतीकात्मक जहाज सोडून नगरपरिषदेच्या स्वच्छता व्यवस्थेविरोधात निषेध नोंदविला.

नगरसेवकांसाठी राखीव असलेल्या सभागृहाचीच अशी अवस्था असेल, तर शहरातील नागरिकांना मिळणाऱ्या स्वच्छता व नागरी सुविधांची स्थिती काय असेल, असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. शहरातील स्वच्छता, देखभाल आणि मूलभूत नागरी सुविधांच्या प्रश्नांकडे प्रशासनाकडून होत असलेले दुर्लक्ष चिंताजनक असल्याचे नगरसेवकांनी नमूद केले.

# ब्राम्हणगाव ग्रामपंचायतीच्या मासिक सभेकडे सत्ताधा-यांची पाठ

प्रतिनिधी ३ जून



**उमरखेड :** मुदत संपलेल्या ब्राम्हणगाव ग्रामपंचायतीत प्रशासकीय व्यवस्था लागू असतानाही गेल्या तीन महिन्यांपासून मासिक सभांकडे सत्ताधारी सदस्यांनी पाठ फिरवल्याचे चित्र दिसून येत आहे. १३ सदस्यांच्या ग्रामपंचायतीची ३० मे रोजी झालेली तहकूब मासिक सभा विरोधी गटातील केवळ दोन सदस्यांच्या उपस्थितीत पार पडल्याने पावसाळ्यापूर्वीच्या महत्त्वाच्या प्रश्नांचे नियोजन कोण करणार, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

फेब्रुवारी २०२६ मध्ये ग्रामपंचायतीचा कार्यकाळ संपल्यानंतर शासनाने सरपंचांना पदसिद्ध प्रशासक, तर सदस्यांना प्रशासकीय समिती सदस्य म्हणून कायम ठेवले आहे. मात्र आर्थिक अधिकार न दिल्यामुळे मार्च, एप्रिल आणि मे महिन्यांतील मासिक सभांबाबत सदस्यांमध्ये अनास्था निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे.

ग्रामपंचायत कार्यालयात २८ मे रोजीची तहकूब सभा ३० मे रोजी ग्रामविकास अधिकारी प्रकाश राठोड यांनी घेतली. या सभेला विरोधी गटाचे शेख खदीर शेख हानिफ आणि ललिता कैलास वाठोरे हे दोनच सदस्य उपस्थित होते. तहकूब सभेला कोरमची आवश्यकता नसल्याने ललिता वाठोरे यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आणि दोन सदस्यांसमोरच इतिवृत्त वाचन करून सभा पूर्ण करण्यात आली.

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालीसफाई, पाणीपुरवठा, दिवाबत्ती, स्वच्छता आणि आरोग्यविषयक उपाययोजनांबाबत निर्णय घेण्यासाठी या सभांना विशेष महत्त्व असते. मात्र आर्थिक अधिकार नसल्यामुळे सदस्यांचा सहभाग कमी झाल्याचे दिसून येत आहे. परिणामी गावातील प्रलंबित प्रश्न आणि पावसाळ्यात उद्भवणाऱ्या अडचणींबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

### आर्थिक अधिकार नसल्याने स्वारस्य कमी

- ग्रामपंचायतीचे सरपंच तथा प्रशासक परमात्मा गरुडे यांनी सांगितले की, शासनाने दोन महिन्यांसाठी प्रशासक म्हणून नियुक्ती केली असली तरी कोणतेही आर्थिक अधिकार दिलेले नाहीत. त्यामुळे सदस्यांमध्ये स्वारस्य राहिलेले नाही. पाणीपुरवठा आणि इतर पावसाळी समस्या गंभीर आहेत. वैयक्तिक कारणामुळे मीही सभेला उपस्थित राहू शकलो नाही. आर्थिक अधिकारांशिवाय कामकाज प्रभावीपणे राबविणे कठीण होत असल्याची भावना सदस्यांमध्ये आहे.

# दिग्रसमध्ये १४ जूनला मोफत आरोग्य शिबिर

प्रतिनिधी ३ जून

**दिग्रस :** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त दिग्रस येथे 'आरोग्य संकल्प अभियान' अंतर्गत भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. 'रुग्णसेवा हिच ईश्वरसेवा' या संकल्पनेवर आधारित हे शिबिर १४ जून रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत दिनबाई विद्यालय येथे होणार आहे.

मा. आरोग्य सेवा समिती, यवतमाळ यांच्या पुढाकारातून दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था, सावंगी (मेघे) तसेच आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात विविध आजारांची मोफत तपासणी, उपचार, शस्त्रक्रियांसाठी मार्गदर्शन आणि औषधांचे वाटप करण्यात येणार आहे.

हृदयविकार, कर्करोग, स्त्रीरोग, बालरोग, त्वचारोग, अस्थिरोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा विकार, श्वसनरोग, मानसिक आजार, न्यूरो विकार, दंत व मुखरोग तसेच मूत्ररोग यांसारख्या आजारांसाठी तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी केली जाणार आहे. महिलांसाठी मेमोग्राफीद्वारे स्तन कर्करोग तपासणी, पॅप स्मिअर चाचणी, बंध्यत्व तपासणी, व्हेरिकोज वेन्स तपासणी, किडनी तपासणी आणि ईसीजीसह विविध आरोग्य चाचण्यांची सुविधाही उपलब्ध राहणार आहे.

तपासणीनंतर आवश्यकतेनुसार रुग्णांना पुढील उपचार, शस्त्रक्रिया आणि विशेष वैद्यकीय सेवांसाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. अनेक उपचार आयुष्मान भारत योजनेअंतर्गत उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली असून शिबिरस्थळी आयुष्मान भारत कार्ड नोंदणीची सुविधाही असेल. त्यासाठी नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड आणि आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

दिग्रस, दरव्हा आणि नेर विधानसभा मतदारसंघांतील गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी हे शिबिर उपयुक्त ठरणार असल्याने जास्तीत जास्त नागरिकांनी या आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. आरोग्य सेवा ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

सिटी न्यूज अमरावती

बुधवार, दि. ३ जून २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## पशुपालकांनी लाभ घेण्याचे आवाहन

**अमरावती:** राज्यातील पशुपालक आणि शेतकऱ्यांना तात्काळ व सुलभ पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा पशुसंवर्धन विभाग, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड (इंध्य्) आणि इंडसइंड बँकेच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारी '१९६२ टोल-फ्री हेल्पलाइन' प्रभावी ठरत आहे. गेल्या पाच वर्षांत या उपक्रमाद्वारे राज्यातील ८ लाखांहून अधिक जनावरांवर उपचार करण्यात आले असून ग्रामीण व दुर्गम भागातील पशुपालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पशुपालकांनी १९६२ हेल्पलाइन व व्हॉट्स ॲप चॅटबॉट सेवेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. मोबाईल व्हेटर्नरी युनिट्सच्या माध्यमातून पशुवैद्यकीय सेवा थेट शेतकऱ्यांच्या दारापर्यंत पोहोचविण्यात येत आहेत.

# आरटीओ कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मागण्यांसाठी निदर्शने

## शासनाचे वेधले लक्ष, 16 जूनपासून बेमुदत संप

प्रतिनिधी ३ जून

**अमरावती : राज्यभराती**ल आरटीओ कार्यालया मध्ये कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्याकरिता शासनाचे लक्ष वेधण्याकरिता कर्मचाऱ्यांनी आज निदर्शनाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. त्या अनुषंगाने आरटीओ विभागातील राज्यभरातील कर्मचारी आपापल्या कार्यालयासमोर निदर्शने करून शासनाचे लक्ष वेधून घेत होते. त्यानंतर ९ जूनला एक दिवसीय लाक्षणीक संप व १६ जूनपासून बेमुदत संप पुकारण्यात येणार आहे.

वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी या २३ पदांचे पदोन्नती प्रस्ताव कित्येक दिवसापासून मंत्रालय स्तरावर प्रलंबित आहे त्यामुळे कर्मचाऱ्यांचे आर्थिक व सामाजिक नुकसान होत आहे. कार्यालय अधीक्षक पदाचे सेवा प्रवेश नियम प्रलंबित असल्याने सेवा प्रवेश नियम तयार करण्यास प्राधान्य द्यावेसहाय्यक मोटार वाहन अभियोक्ता या पदाचे सेवा प्रवेश नियम नसल्याने विभागातील विधी पदवीधारक नियुक्ती पासून वंचित आहे, वर्ग ३ संवर्गातील सर्व पदांचे सेवा प्रवेश नियम तयार करण्यात यावे. पदनाम बदल - लिपिक टंकलेखक, वरिष्ठ लिपिक या पदाचे परिवहन सहाय्यक व वरिष्ठ परिवहन सहाय्यक पदनाम बदल करण्यात यावे, आश्वासित प्रगती योजना- वरिष्ठ लिपिक व कार्यालय अधीक्षक



पदावरील कर्मचाऱ्यांना सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ अद्याप दिलेले नाही ते तात्काळ देण्यात यावे, प्रतिनियुक्ती रद्द केलेल्या कर्मचाऱ्यांच्या कायमस्वरूपी बदल्या संबंधित विभागात करण्यात याव्यात.परिवहन आयुक्त कार्यालयातील प्रशासन विभागातील काही कर्मचाऱ्यांना बदली कायदा २००५ लागू करण्यात यावा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत तातडीने प्रलंबित प्रश्न निकाली काढावे अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही संघटनेच्या वतीने मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तथा अमरावती विभागाचे अध्यक्ष अनिल मानकर, अभिजीत गावंडे, अक्षय राठोड, स्वप्निल खडसे,अमोल माटोडे, अनिल मेश्राम, आशिष माथुरकर,अरुण वाघमारे, ज्ञानेश्वर काळे,अश्विनी चव्हाण, रस्मिता पवार,शारदा हेडाऊ, प्रतिभा ठाकरे ,प्रीती डोंगरे, मीनल गिरे, वर्षा कोटरंगे, यशवंत रामटेके,देवानंद खंडारे, प्रवीण मुंगळे,सोहम हेमणे, प्रवीण तायवाडे,मनोज खोब्रागडे,संजय चौधरी, जयसिंग राठोड,पराग जाधव, देवेंद्र कळमकर, शिला रणदिवे आदी कर्मचारी निदर्शनाला सहभागी झालेले होते.

### तीन टप्प्यात करण्यात येणार आंदोलन

तीन टप्प्यांमध्ये आंदोलन उभारले जाणार असून, २ जून दोन तासांची निदर्शने केल्यानंतर९ जून एक दिवसाचा लाक्षणिक संप करण्यात येणार आहे. त्यानंतर जर शासनाने आमच्या मागण्या मान्य न केल्यास नाईलाजास्तव आम्हाला १६.जून बेमुदत संप करावा लागणार आहे.

# अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर अमरावती ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई

प्रतिनिधी ३ जून

**अमरावती :** अवैध दारू विक्री करणा-यांवर अमरावती ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई केली.

पोलीस अधिक्षक यांनी अमरावती ग्रामीण जिल्हयामध्ये होत असलेल्या अवैध हातभट्टी गावठी दारू तयार करणारे व विक्री करणा-यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने केलेली कारवाई खालीलप्रमाणे.

पो.स्टे. शिरजगाव : दि. ०२/०५/२६ रोजी पो.स्टे. शिरजगाव कसबा हद्दीत पाळा येथे मेधा नदी काठी छापा कारवाई केली असता आरोपी संजु काशीनाथ कासदेकर, वय ३१ वर्ष, रा. बेतुल, मध्यप्रदेश, अब्दुल अन्सार शेख तुराप, वय ४८ वर्ष, रा. खोमई, ता. भैंसदेही, मध्यप्रदेश यांचे ताब्यातून २०० लीटर गा.हा.भ. दारू कि.अं. २०,०००/-, मोहमाच सडवा ३,००० लीटर कि.अं. १,२०,०००/- तसेच दारू बनविण्या साठी वापरण्यात येणारे गुळ, नवसागर इ. साहीत्य कि.अं. १३,१००/- असा एकूण १,५२,९००/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.




, पो.स्टे. मंगरूळ च. आज रोजी मंगरूळ चवाळा पारधी बेडयावर छापा कारवाई केली असता, आरोपी सपना किसन भोसले, वय ३५ वर्ष, रा. मंगरूळ च., रेशमा प्राणहंस भोसले, वय ४५ वर्ष, रा. मंगरूळ च., ललित उकंडा भोसले, वय ६४ वर्ष, रा. मंगरूळ च. या तिन्ही आरोपींचे ताब्यातून एकूण २५० लीटर गा.हा.भ. दारू किं. अं. २५,०००/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला व मोहमाच सडवा एकूण ४०० ली किं.अं. २२,५००/- रू असा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला. पो.स्टे. ब्राम्हणवाडा सदर कारवाई दरम्यान आरोपी नामे जामवंत टीमाजी थोटे, वय ५८ वर्ष, रा. चिचकुंभ यांचे राहते घरी छापा कारवाई केली असता त्यांचे ताब्यातून ७५ लीटर गा.हा.भ. दारू आणि गुळ, नवसागर इ. साहीत्य किं.अं. १५,०००/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला व रनिंग हातभट्टी सुरू असताना रेड केली असता अंदाजे २०० लीटर मोहमाच सडवा किं.अं.२,००,०००/- रू चा मिळून आल्याने तो जप्त करून नष्ट करण्यात आला.

तसेच काल दि. ०१/०५/२०२६ रोजी पो.स्टे. शिरजगाव हद्दीतील ग्राम पाळा नजीक (महाराष्ट्र-मध्यप्रदेश सिमेवरिल) मेघा नदीपात्रात छापा कारवाई करून गावठी हातभट्टी चालक आशिक कासदेकर, रा. सुपाळा (मध्यप्रदेश) यास ताब्यात घेवून १२० लीटर गा.हा.भ. दारू किं.अं. २४,०००/- २) २४०० लीटर मोहमाच सडवा किं.अं. २,४०,०००/- तसेच इतर साहीत्य गुळ, नवसागर इ. साहीत्य ५०,७५०/- असा एकूण ३,१४,७५० रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अशाप्रकारे एकूण ६४५ लीटर गा.हा.भ. दारू कि.अं ८४,०००/-, मोहमाच सडवा एकूण ६००० लीटर किं. अं ५,६३,८५०/- व इतर दारू बनविण्याचे साहीत्य किं. अं.६३,८००/- असा एकूण ७,११,६५०/- रू चा मुद्देमाल मिळून आला.

सदरची कार्यवाही मा. निकेतन कदम, (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक,, यांचे आदेशान्वये दत्ता तोटेवाड, (म.पो.से.) अपर पोलीस अधिक्षक, यांचे मार्गदर्शनात किरण वानखडे, पो.नि. स्था.गु.शा., अमन शिरसाट, ठाणेदार, शिरजगाव., प्रशांत जाधव, ठाणेदार, ब्राम्हणवाडा तसेच राजू हाके, ठाणेदार, मंगरूळ च. स्था.गु.शा. येथील सपोनि अमोल मुडे, पोउपनि सागर हटवार यांच्या पथकाने आर.सी.पी. पथकाच्या सहाय्याने केली.

## श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र रहाटगाव येथे भागवत कथेचे आयोजन



प्रतिनिधी ३ जून

**अमरावती :** श्री. स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र, रहाटगाव ,अमरावती च्या वतीने अधिक मासानिमित्त संगीतमय श्रीमद् भागवत कथेचे आयोजन ७ जून पासून करण्यात येणार आहे. हि कथा १३ जून पर्यंत होणार असून दुपारी ३ ते सायंकाळी ६ पर्यंत श्रीमद् भागवताचार्य, वाणीभूषण गुरुवर्य ह.भ. प श्री पंकज महाराज पवार, आळंदीकर यांच्या सुमधुरवाणीतून या कथेचा लाभ घेता येणार आहे .हरिनाम गर्जता नाही भय चिंता, ऐसी बोलो गीता भागवत

सर्व भाविक भक्त व सेवेकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून या कथेचा लाभ घेण्याचे आवाहन मंदिराच्या विश्वस्त निर्मलाताई बोरखडे व इतर मंडळींनी केले आहे.

# थिलोरीतील नागरी समस्यांवर ग्रामस्थ आक्रमक

## ८ दिवसांत कामे न झाल्यास बेमुदत आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी ३ जून

**दर्यापूर :** पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही थिलोरी गावातील नालेसफाई, लेंडी नाल्याचे खोलीकरण, जंतुनाशक फवारणी, स्ट्रीट लाईट व्यवस्था व शेतरस्त्यांच्या दुरुस्तीची कामे प्रलंबित असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी ग्रामपंचायत थिलोरीचे सचिव पी. एन. चारथड यांना निवेदन देऊन तातडीने कार्यवाहीची मागणी केली.

निवेदनात गावाच्या मध्यभागातून वाहणाऱ्या लेंडी नाल्यात मोठ्या प्रमाणात गाळ, कचरा व झुडपे साचल्याने पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच गावातील अनेक नाल्यांची साफसफाई न झाल्याने सांडपाणी साचत असून रोगराई पसरण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे तातडीने नालेसफाई, जंतुनाशक फवारणी व स्वच्छता मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय जिल्हा परिषद



प्राथमिक शाळेसमोरील परिसरासह गावातील अनेक भागांत स्ट्रीट लाईटची सुविधा नसल्याने नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. थिलोरी–गणेशपूर मार्गासह अनेक शेतरस्त्यांची अवस्था दयनीय झाली असून पावसाळ्यात शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागू शकते, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी ग्रामपंचायत सदस्या सौ. पद्माताई चुडे यांनी ग्रामपंचायतीच्या कारभारावर टीका करत, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीदिनीही त्यांच्या पुतळा परिसरातील नालीची साफसफाई करण्यात आलेली नाही. ग्रामपंचायत जर इतकी साधी जबाबदारी पार पाडू शकत नसेल, तर गावातील स्वच्छता व विकासकामांबाबत काय अपेक्षा ठेवायची?' असा सवाल उपस्थित केला. दरम्यान, निवेदनातील मागण्यांवर आठ दिवसांच्या आत ठोस कार्यवाही न झाल्यास ९ जून २०२६ पासून पंचायत समिती, दर्यापूर येथे गटविकास अधिकारी यांच्या दालनासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. यावेळी निवेदन देताना प्रामुख्याने अमित पाटील होले, इंजी. अनिकेत वाकपांजर, नंदकिशोर पाटील टापरे, अनिल पाटील होले, गौतम वाकपांजर, सतीश चुडे, प्रमोद पाटील होले, बाबुलाल राऊत, मायाताई ओलोकार, पद्माताई चुडे, अनिल घुरडे, मनोज तांबडे, नागेश होले, गोपाळ सरोदे, प्रकाश दाळू, प्रवीण धर्माळे, गोपाळ कोळस्कर, विलास कावरे, संतोष पूनसे, गजानन भालेराव, अमोल सरोदे, संतोष भालेराव, राहुल तांबडे, राजेश पावडे, भानुदास सरोदे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## वंचित आघाडीचे डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी भरला नामांकन



**अमरावती :** चांदूर रेल्वे नगराध्यक्षा डॉ.प्रियांका विश्वकर्मा यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचून डॉक्टर निलेश विश्वकर्मा यांनी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने विधान परिषद मतदार संघासाठी नामांकन अर्ज दाखल केला आहे. नामांकनाच्या वेळी वंचितचे प्रदेश उपाध्यक्ष हर्षवर्धन पुंडकर, प्रदेश सरचिटणीस राजेंद्र पातोडे, जिल्हाध्यक्ष राहुल मेश्राम उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालयात पालिका सदस्य हर्षद वाघ, अरिहंत गेडाम यांच्यासह संजय चोरपगार, प्राजक्ता किल्लेवार, अभय तायडे, बाबाराव गायकवाड, सुरेंद्र खंदारे, रमेश आठवले, सागर भोवते, प्रशांत गजभिये, आनंद इंगळे आदी उपस्थित होते.

# अवैध गुटखा पकडला; अमरावती ग्रामीण पथकाची कारवाई

**अमरावती :** अवैध गुटखा पकडला अमरावती ग्रामीण पथकाची कारवाई केली आहे.

पोलीस अधिक्षक अमरावती निकेतन कदम यांनी अमरावती ग्रामीण जिल्हयामध्ये होत असलेल्या अवैद्य गुटखा विक्री करणा-यांवर सक्त कारवाई करण्याचे आदेश सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना दिले.

त्यानुसार आज दि.०२/०६/२०२६ रोजी मिळालेल्या माहितीनुसार चांदुर बाजार टाऊन मध्ये स्था.गु.शा.चे पो.उप.नि. नितीन इंगोले यांच्या पथकाने पो.स्टे. चांदुर बाजार पोलीसांसह सापळा रचुन



अमरावती कडे जाणा-या संशयोत बोलेरो पिक अप वाहनाला अमरावती रोडवरील रेल्वे फाटका जवळ थांबवीण्याचा प्रयत्न केला असता पोलीसांना पाहून बोलेरो चालकाने त्याचे वाहन तेथे न थांबविता बाजुच्या गल्लीत भरधाव वेगाने नेवून पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यास स्था. गु. शा. पथकाने पाठलाग करुन थांबवीले असता सदर बोलेरो वाहनाचा चालक व क्लिनर गल्ली बोळयातून पळून जावू लागले. पोलीस पथकाने पाठलाग करुन त्यांचे पैकी क्लिनर शोएब अली अशफाक अली, वय २४ वर्ष यास पकडले व विचारपूस केली असता बोलेरो पिक अप वाहन क्र.एम.एच.४८ सी.बी.३२४७ मध्ये प्रतिबंधीत गुटखा असल्याचे त्याने सांगितले. पंचासमक्ष वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये २० मोठ्या पांढ-या पोत्यामध्ये हॉट पान मसाला व सुंगधीत तंबाखूचे पाकीट किं. अं.८.५८,०००/- रु.चा माल मिळून आला. त्यानुसार अन्न व सुरक्षा विभागाच्या अधिका-यांच्या उपस्थितीत पंचनामा करुन आरोपी शोएब अली अशफाक अली वय २४ वर्ष, बोलेरा वाहन चालक सज्जु नावाचा इसम तसेच वाहन मालक, पिंटु ऊर्फ मोहम्मद साबोर मोहम्मद रफीक व विक्रीसाठी प्रतिबंधीत सुपारी व तंबाखु आणनारे अमरावती येथील, शेख अभीन शेख नाजीम, सै. जुनेद सै. जब्बार,विकी मंगलानी, आसीफ अशफी सर्व रा अमरावती भारतीय न्याय संहितेच्या व अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ चे विविध कलमान्वये पो.स्टे. चांदुर बाजार येथे गुन्हा नोंद करण्यात आला.


# डॉ. सागर धनोडकर कॉम्रेड्स मॅरेथॉन 2026 स्पर्धेमध्ये होणार सहभागी

## अमरावतीचा नावलौकिक उंचाविण्यासाठी आ. संजय खोडके यांनी शुभेच्छा देऊन सुयश चिंतिले

प्रतिनिधी ३ जून

**अमरावती :** आगामी १४ जून रोजी दक्षिण आफ्रिकेतील डर्बनमध्ये जागतिक पातळीवरील अल्ट्रामॅरेथॉन-कॉम्रेड्स मॅरेथॉन २०२६ होत आहे. या स्पर्धेमध्ये अमरावतीचे डॉ. सागर धनोडकर हे दुसऱ्यांदा सहभागी होत आहे. हि अमरावतीसाठी अत्यंत गौरवाची व अभिमान वाढविणारी बाब असल्याने महाराष्ट्र विधानपरिषद आमदार संजय खोडके यांनी डॉ. सागर धनोडकर यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा देऊन सुयश चिंतिले आहे.

जगातील सर्वात जुनी, सर्वात मोठी आणि अत्यंत कठीण मानली जाणारी अल्ट्रामॅरेथॉन — कॉम्रेड्स मॅरेथॉन २०२६ च्या ९९ व्या आवृत्तीत यावर्षी ८४ देशांतील २१,६३३ पात्र धावपटू सहभागी होत आहेत. भारताकडून एकूण २७९ धावपटू या प्रतिष्ठित स्पर्धेत सहभागी होत असून, त्यापैकी महाराष्ट्रातील २७० धावपटू आहेत. विदर्भातील अमरावती शहरासाठी ही अत्यंत अभिमानाची आणि गौरवाची बाब आहे की, डॉ. सागर धनोडकर सलग दुसऱ्यांदा या ऐतिहासिक आणि



अल्ट्रा ह्युमन रेसमध्ये अमरावतीचे एकमेव प्रतिनिधी म्हणून सहभागी होत आहेत.

गेल्या सहा महिन्यांपासून व्यावसायिक, कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळत, दिवस-रात्र अथक मेहनत, शिस्त आणि सातत्याच्या बळावर ६० किमी, ५६ किमी, ५० किमी,४८ किमी, ३६ किमी, २७ किमी आणि १८ किमी अशा लांब पल्ल्याच्या कठीण रन पूर्ण करून त्यांनी या महासंग्रामाची तयारी केली आहे. आता ९ जून रोजी अमरावतीहून मुंबई आणि १० जून रोजी दक्षिण आफ्रिकेतील डर्बनकडे डॉ. सागर धनोडकर यांचा प्रवास सुरू होत आहे, जिथे १४ जून २०२६ रोजी ही जागतिक कीर्तीची कॉम्रेड्स मॅरेथॉन संपन्न होणार आहे. हि केवळ एक शर्यत नसून ही धैर्य, समर्पण, संयम, शिस्त आणि मानवी इच्छाशक्तीची सर्वोच्च परीक्षा असल्याने संपूर्ण अमरावती शहरवासी डॉ. सागर धनोडकर यांच्या प्रेरणादायी प्रवासाचा अभिमान बाळगत आहे. त्यांच्या सुखद प्रवासासाठी, उत्तम स्वास्थ्यासाठी, उत्कृष्ट सहभागासाठी आणि सुरक्षित व यशस्वी रेस पूर्णत्वासाठी आमदार संजय खोडके यांनी यांनी त्यांना शुभेच्छा देऊन हार्दिक अभिनंदन केले आहे. डॉ. सागर धनोडकर कॉम्रेड्स मॅरेथॉन २०२६ मध्ये इतिहास घडवणार असल्याचा विश्वास व्यक्त करून आमदार- संजय खोडकेंनी त्यांचे सुयश चिंतिले आहे.

## परदेशात उच्च शिक्षणासाठी अनुसूचित जमातीच्या ४० विद्यार्थ्यांना मिळणार शिष्यवृत्ती

प्रतिनिधी ३ जून

**अमरावती :** अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळावी, आणि त्यांच्या गुणवत्तेला जागतिक स्तरावर वाव मिळावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून 'परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती' योजना राबवली जात आहे. या योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ४० गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहे, अशी माहिती धारणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी सिध्दार्थ शुक्ला यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. आदिवासी विकास विभागाकडून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या ४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. शिष्यवृत्तीमध्ये शिक्षण व परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक आकस्मिक/इतर खर्च, विमान प्रवास खर्च, व्हिसा शुल्क आणि आरोग्य विमा यांचा समावेश असणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि ३ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

राजकीय ॲक्टर,
स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर,
अविवेकी डॉक्टर ,
बोगस कॅरेक्टर...









# डॉ. मानेची खोटी शान, जन्मापुर्वीच काटतो चिमुकल्याची मान !

*** कर्तव्याची नाही जान, सामाजिकतेची नाही भान, पैशालाच मान, मानवतेची घान...**
***मालेगाव येथील अविवेकी डॉक्टरच्या दवाखान्यातील स्त्रीभृण हत्या प्रकरण...**

●सिटी न्युज ब्युरो @वाशीम●

मालेगाव येथील अविवेकी डॉक्टरच्या स्त्री भ्रूण हत्येसाठी राज्यातच नव्हेतर शेजारच्या राज्यातही प्रसिद्ध असलेल्या दवाखान्यामध्ये बेकायदेशीररित्या स्त्री भ्रूण हत्या प्रकरणी मालेगाव येथील वैद्यकीय अधीक्षकांनी मालेगाव पोलीस ठाण्यात तक्रार देवून जवळपास दोन आठवडे झालेत. दोन आठवडे होवूनही मालेगाव पोलीसांनी 'या' महापापात सहभागी असलेल्या प्रमुख आरोपीसह कथित अज्ञात महिला डॉक्टरला अटक न केल्याने पोलीसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'या' महापापात अविवेकी डॉक्टरला 'साथ' देणाऱ्या महिला डॉक्टरला म्हणजेच माने दाम्पत्यावर पोलीसांनी मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवावा, तसेच ' या ' प्रकरणाचा तपास एसआयटी मार्फत करण्यात यावा अशी मागणी जागरूक नागरिकांकडून होत आहे.




मालेगाव येथील अविवेकी डॉक्टरचा दवाखाना सोनोग्राफीच्या माध्यमातून फक्त मुलगा पाहिजे असलेल्या पालकांसाठी 'वरदान' ठरला आहे. पैशाच्या लोभापायी 'या' अविवेकी डॉक्टरने मेल चाईल्ड (गुड न्यूज) आणि फिमेल चाईल्ड (बॅड न्यूज) राजाश्रयाच्या भरवशावर खुलेआम गर्भ लिंग चाचण्याकरून आजपर्यंत कोट्यवधी रूपये जमा केल्याची परिसरात चर्चा आहे. अविवेकी डॉक्टरचे या महापापातील नेटवर्क एवढे स्ट्राँग असून या नेटवर्कची व्याप्ती फक्त महाराष्ट्रापुरती नसून शेजारच्या राज्यापर्यंत पोहोचले असल्याची पंचक्रोशीत चर्चा आहे. या प्रकरणी मालेगाव पोलीस ठाण्यात अविवेकी गँगच्या विरोधात गुन्हा दाखल होवून जवळपास दोन आठवड्याचा कालावधी झाला आहे. मालेगाव पोलीसांचे मौनव्रत बरेच काही सांगून जाते अशी उपरोधीक टीकाही मालेगाव परिसरातील जनतेमधून केल्या जात आहे. वैद्यकीय अधीक्षकांनी मालेगाव पोलीसात अविवेकी कृत्याच्या विरोधात मोठ्या धाडसाने तक्रार दिली आहे. मात्र, त्या तक्रारीत अविवेकी डॉक्टरच्या दवाखान्या बोर्डवर स्पष्टपणे नमूद असलेल्या अविवेकी डॉक्टरच्या 'महिला डॉक्टर' असलेल्या पत्नीचे नाव लिहिण्याऐवजी 'अज्ञात' महिला डॉक्टर असा उल्लेख केला आहे. मालेगाव परिसरातील सर्व जनतेला या दवाखान्याची माहिती असून या महापापात सहभागी असलेल्या माने दाम्पत्याच्या सर्व मोबाईलचे 'सीडीआर' काढल्यास या जोडप्याच्या सतत संपर्कात राहून स्त्री भ्रूण हत्येच्या महापापात सहभागी असलेल्या वाशीमसह इतर गावातील कथित डॉक्टर मंडळी व दलालांची 'मोठ्ठी' यादीच तपास अधिकाऱ्याच्या निदर्शनास येईल, असा दावाही जागरूक नागरिकांकडून केल्या जात आहे. या प्रकरणात काही ठोस कारवाई होवून माने दाम्पत्याचा अनेक वर्षापासून खुलेआम सुरू असलेला हा गोरखधंदा कायमस्वरूपी बंद व्हावा, माने दाम्पत्यासह सर्व दलालांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हावा अशीही जनतेची अपेक्षा आहे.

## डॉक्टरांचे चॅलेंज, म्हणे प्रकरण करतो मॅनेज

कारंजा येथील डॉक्टर रंजनी राठोड व मालेगाव येथील डॉक्टर विवेक माने यांना राजकारणाची व्हाईट कॉलर असून काळ्या कृत्यानंतरही त्यांची वागण्याची कृती ताईट आहे. मानवतेला कळीमा फासणाऱ्या कृत्यामुळे राजकारणातून समाजकारणाचा खोटा आव आणणारे डॉ. राठोड व डॉ. माने यांच्या सोनोग्राफी सेंटरवर आरोग्य विभागाने धाड टाकल्याने हे उघड झाले आहेत. यावर डॉक्टरांनी राजकीय व पैशाच्या जोरावर चॅलेंज केले आहे. प्रकरण वरिष्ठ स्तरावरून मॅनेज करणार असल्याच्या वल्गना करीत आहेत. चोरच्या चोर वरून मुजोर असणाऱ्या कारंज्याच्या डॉ. राठोड मालेगाव चे डॉ. माने यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## थोडक्यात

### पोस्टर व पथनाट्यातुन एनसीसी विद्यार्थ्यांची तंबाखूविरोधी प्रभावी जनजागृती

●सिटी न्युज ब्युरो @वाशीम●

वाशिम - जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त ३१ मे रोजी येथील श्री बाकलीवाल विद्यालयात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जनजागृतीपर पोस्टर स्पर्धा व पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात ११ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अकोलाच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी अधिकारी अमोल काळे यांच्या नेतृत्वात विद्यालयातील ४५ एनसीसी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे व जिल्हा आरोग्य अधिकारी पांडुरंग ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी जिंदगी चुने, तंबाखू नहीं या संदेशावर आधारित पोस्टर्स सादर केली व पथनाट्याद्वारे शहरातील चौका-चौकात जाऊन तंबाखूविरोधी जनजागृती केली.

## वाशीम जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेत कोट्यवधीचा भ्रष्टाचार...

# पावसाळी अधिवेशनात 'तारांकीत' प्रश्न !

*** काँग्रेस नेते आ. विजय वडेट्टीवार यांचा पुढाकार**
*** सिटी न्यूज सुपरफास्टच्या रोखठोक वृत्ताची दखल**

●सिटी न्युज ब्युरो @रिसोड●

वाशीम जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेत कोट्यवधी रूपयाचा भ्रष्टाचार झाल्याबाबत काँग्रेस पक्षाचे तडफदार नेते तथा ब्रम्हपूरीचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात 'तारांकीत 'प्रश्न लावला आहे. हा तारांकीत प्रश्न ६ जुलै २०२६ रोजी अधिवेशनात गाजणार आहे. या तारांकीत प्रश्नाला शालेय शिक्षण मंत्री सभागृहात उत्तर देणार आहेत. या प्रश्नामुळे वाशीम जिल्ह्यातील आधीच विविध भ्रष्टाचाराने बदनाम झालेल्या शिक्षण विभागासह शालेय पोषण आहाराचा कागदोपत्री पुरवठा करणाऱ्या जगदंबा एंटरप्रायझेस, बीड या पुरवठा करणाऱ्या एजंसीच्या संचालकांमध्ये खळबळ उडाल्याचे वृत्त आहे.

वाशीम जिल्ह्यातील शालेय पोषण आहारात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू असल्याची चर्चा होती. या प्रकरणी जागरूक नागरिकांनी शिक्षण विभागाकडे माहितीच्या अधिकारात माहिती मागितली. शिक्षण विभागाकडून मिळालेल्या माहिती मधूनच वाशीम जिल्ह्यात शालेय पोषण आहारामध्ये बोगस पावत्या दाखवून कोट्यवधीचा




भ्रष्टाचार खुलेआम पुरवठा एजंसी आणि शिक्षण विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने सुरू असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. या कोट्यवधीच्या भ्रष्टाचारा प्रकरणी सिटी न्यूज सुपरफास्टने रोखठोक वृत्त प्रकाशीत करून झारीतील शुक्राचार्यांच्या भ्रष्टकार्याचा पर्दाफाश केला होता. या कोट्यवधीच्या भ्रष्टाचार प्रकरणामध्ये काँग्रेसचे तडफदार नेते तथा ब्रम्हपूरीचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी लक्ष घातले आहे. वाशीम जिल्ह्यातील शालेय पोषण आहारात सुरू असलेल्या कोट्यवधी रूपयाच्या भ्रष्टाचारामधील माहितीच्या अधिकारात मिळालेली माहिती आणि जगदंबा एंटरप्रायझेस, बीड यांनी पुरवठा केलेल्या पावत्या, प्रत्यक्ष शाळेला मिळालेली पोहोचपावती यामध्ये प्रचंड तफावत असल्याची धक्कादायक बाब आ. विजय वडेट्टीवार यांच्या निदर्शनास आली. या घोटाळ्याचे गांभीर्य पाहून आमदार वडेट्टीवार यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात वाशीम जिल्हातील शालेय पोषण आहार योजनेत कोट्यवधी रूपयाचा भ्रष्टाचार झाल्याबाबत तारांकीत प्रश्न लावला आहे. सभागृहामध्ये या तारांकीत प्रश्नासंदर्भात २७ मे रोजी सूचना देण्यात आली असून या तारांकीत प्रश्नाचा क्रमांक ३९२१० आहे. हा प्रश्न पावसाळी अधिवेशनात ६ जुलै २०२६ रोजी सभागृहात लागणार असून 'या' प्रश्नात आमदार वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे शालेय शिक्षण मंत्र्यांना सभागृहासमोर द्यावी लागणार आहेत. तसेच पुरावेसुद्धा सादर करावे लागणार असल्याने शिक्षण विभागासह पुरवठादार जगदंबा एंटरप्रायझेस, बीड च्या संचालकांमध्येही खळबळ उडाली आहे. आता 'या' प्रकरणात सहभागी असलेल्या सर्व साखळीचे काळेकृत्य उघडकीस येणार असुन अनेकांना तुरुंगाची 'वारी' करण्याचा योग येणार असल्याची जाणकारांमध्ये चर्चा आहे.

## कृषीविभागाकडून शेतकऱ्यांना बांधावर जाऊन मार्गदर्शन करण्याची गरज...

# शेतकऱ्यांना विविध योजनेची माहिती मिळेना !

●सिटी न्युज ब्युरो @रिसोड●

सध्या शेतकरी रब्बी हंगामातील पिके काढून झाल्यावर आगामी खरीप हंगामातील पेरणी करता शेती मशागत कामात मग्न आहे. यदा हवामान विभाग व इतर विभाग यांनी पावसाळ्यात अलनिनो प्रभावामुळे सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवत आहे.

यामुळे शेतकऱ्यात पावसाविषयी चलबिचल होते आशा आशावेळी शेतकऱ्यांना तालुका कृषी विभागाकडून, जिल्हा परिषद, पंचायत समिती कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना गावात व बांधावर जाऊन, पावसाच्या अंदाजानुसार कोणत्या पिकाची निवड करावी, बि बियाणे निवड, पाणी नियोजन, आगामी पिकांची काळजी कशी घ्यावी, कोणते औषध फवारणी करावी, खत नियोजन व इतर बाबतीत सातत्याने मार्गदर्शन करण्याची गरज आहे.

शेतकऱ्यांना नियमित मार्गदर्शन बरोबर शासनाच्या शेतकरी हिताच्या योजना, उपक्रम बाबतीत तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पंचायत समिती कृषी विभागाच्या वतीने जनजागृती करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची अपेक्षा शेतकऱ्यातून व्यक्त होत आहे. सध्या तालुक्यातील विविध शेताशिवारात शेतकरी आगामी खरीप हंगामासाठी शेती तयार करणे इतर कामात मग्न आहेत.

## ग्रामीण भागातही ट्युशन संस्कृतीचे वाढते जाळे...

# शिक्षणाच्या व्यापारीकरणामुळे पालकांवर आर्थिक ताण !

●सिटी न्युज ब्युरो @रिसोड●

एकेकाळी शहरांपुरती मर्यादित असलेली ट्युशन संस्कृती आता ग्रामीण भागातही वेगाने वाढत आहे. पहिलीपासून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना खाजगी शिकवणी लावणे ही जणू गरजच बनली असून, अनेक ठिकाणी शाळेपेक्षा ट्युशनमध्येच विद्यार्थ्यांची अधिक गर्दी दिसून येत आहे. त्यामुळे 'आता शाळा की ट्युशन?' असा प्रश्न पालकांसमोर उभा राहिला आहे.



नवोदय, शिष्यवृत्ती, सैनिक शाळा तसेच विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीच्या नावाखाली ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर कोचिंग क्लासेस सुरू झाले आहेत. आकर्षक जाहिराती, पोस्टर्स आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून विद्यार्थी व पालकांना यशाची स्वप्ने दाखवली जात आहेत. काही क्लासेसकडून ट्युशनशिवाय गुणवत्तापूर्ण शिक्षण शक्य नसल्याचे चित्र निर्माण केले जात आहे. या परिस्थितीमुळे पालकांवर मोठा आर्थिक भार पडत आहे. शेतकरी, शेतमजूर व कष्टकरी कुटुंबांनाही मुलांच्या शिक्षणासाठी हजारो रुपयांची फी भरावी लागत आहे. अनेकांना यासाठी कर्ज घ्यावे लागत असून इतर गरजांवर खर्च कमी करावा लागत आहे. शिक्षण क्षेत्रातील जाणकारांच्या मते, शाळांमध्ये दर्जेदार अध्यापन झाले तर स्वतंत्र ट्युशनची गरज भासणार नाही. मात्र सध्या शाळा केवळ उपस्थितीपुरत्या मर्यादित राहिल्याचा समज वाढत असून, खरे शिक्षण ट्युशनमध्येच मिळते, अशी मानसिकता तयार होत आहे. त्यामुळे शिक्षणाचे वाढते व्यापारीकरण रोखण्यासाठी आणि पालकांची आर्थिक लूट थांबवण्यासाठी खासगी शिकवणी वर्गांवर नियंत्रण आणावे, तसेच शाळांमध्येच अतिरिक्त अध्यापनाची प्रभावी व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

**शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क आहे. तो केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबांपुरता मर्यादित राहू नये. शिक्षणातील असमानता कमी करण्यासाठी शासनाने ट्युशन संस्कृतीवर नियंत्रण ठेवून शाळांमधील अध्यापन अधिक सक्षम करण्याची गरज आहे.**

## अंचळ येथील कामाची देयके आधी, भ्रष्टाचाराचा विधी, गायब निधी...

# ग्रामसेवकांचा प्रताप भारी, एमबी नुसार व्हाचर दाखवा एकतरी !

*** व्हाउचरमध्ये विकास दिसतो, पण गावात शोधावा लागतो *म्हणे सीईओ हाताशी; मग भीती कशाचा**

●प्रभाकर नाईकवाडे @रिसोड●

रिसोड तालुक्यातील अंचळ ग्रामपंचायतीतील विकासकामांबाबत ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील व्हाउचर, खर्चाच्या नोंदी आणि मोजमाप पुस्तिका (एमबी) यामध्ये अनेक कामे पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात त्या कामांचा शोध घ्यावा लागत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

### अंचळ केवळ सुरुवात... आता केनवड परिसरातील गावागावांचा सिटी न्यूज सुपरफास्ट हिशोब बाहेर आणणार

१४ वा वित्त आयोग, १५ वा वित्त आयोग, स्मशानभूमी सुशोभीकरण, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच इतर विकासकामांशी संबंधित व्हाउचर, एमबी, बिले, खर्चाच्या नोंदी आणि नागरिकांच्या तक्रारींचे संकलन सिटी न्यूज सुपरफास्टकडून सुरू आहे. अंचळ हे केवळ सुरुवात असून, केनवड परिसरातील अनेक गावांबाबतची कागदपत्रे व पुरावे सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती लागले आहेत. गावागावातील विकासकामे, निधी खर्च, कागदावरील नोंदी आणि प्रत्यक्ष वास्तव यातील तफावत उघड करणारी विशेष वृत्तमालिका लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार आहे. गावागावचा प्रश्न, गावागावचा हिशोब आणि जनतेच्या पैशाचा लेखाजोखा आता जनतेसमोर मांडला जाणार आहे. कागदावर विकास दाखवणाऱ्यांनी सावध राहावे; कारण आता प्रत्येक व्हाउचर, प्रत्येक बिल, प्रत्येक एमबी आणि प्रत्येक कामाची पडताळणी करत सिटी न्यूज सुपरफास्ट भ्रष्टाचार जनतेसमोर आणणार.




विशेष म्हणजे, १४ वा वित्त आयोग, १५ वा वित्त आयोग, स्मशानभूमी सुशोभीकरण, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच इतर विकासकामांसाठी निधी खर्च झाल्याच्या नोंदी उपलब्ध आहेत. मात्र त्या खर्चाच्या बदल्यात प्रत्यक्षात किती कामे झाली, ती मंजूर अंदाजपत्रकानुसार पूर्ण झाली का, याची चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. गामस्थांच्या म्हणण्यानुसार, ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील काही व्हाउचरमध्ये मजुरी, कार्यालयीन खर्च तसेच विविध कामांच्या नावाने देयके अदा केल्याचे दिसून येते. मात्र संबंधित कामांची ठिकाणे, कामाचा दर्जा आणि प्रत्यक्ष लाभ याबाबत स्पष्ट माहिती मिळत नसल्याने संशय अधिक बळावत आहे. दरम्यान, 'सीईओच आमच्या हाताशी आहेत; मग भीती कशाची?' अशी चर्चा परिसरात सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे या चर्चेमुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, यातील सत्यता समोर आणण्यासाठी स्वतंत्र चौकशीची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. ई-ग्रामस्वराज पोर्टलवरील अनेक व्हाउचरमध्ये विविध खर्चाच्या नोंदी दिसून येत आहेत. मात्र या खर्चाच्या बदल्यात नेमकी कोणती कामे झाली, कोणाला देयके अदा करण्यात आली आणि कामांचा दर्जा काय आहे, याची निष्पक्ष पडताळणी होणे आवश्यक असल्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती लागलेल्या व्हाउचर व खर्चाच्या नोंदींमुळे या प्रकरणाची व्याप्ती अधिक गंभीर असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे अंचळ ग्रामपंचायतीतील १४ वा वित्त आयोग, १५ वा वित्त आयोग तसेच इतर विकासकामांची उच्चस्तरीय चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे व दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी आता अधिक तीव्र झाली आहे.

## आरटीओचा प्रताप, भंगार गाड्यांचा वाढला ताप !

●सिटी न्युज ब्युरो @रिसोड●

रिसोड शहरात आणि परिसरात भंगार व रस्त्यावर धावण्यास अयोग्य ठरलेल्या वाहनांचा सध्या अक्षरशः सुळसुळाट झाला असून, संबंधित यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे प्रवाशांच्या जीवाशी उघडपणे खेळ सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. परमिटची मुदत संपलेली, लाखो रुपयांचा दंड थकीत असलेली तसेच तांत्रिकदृष्ट्या निकामी झालेली अनेक वाहने आजही प्रवासी वाहतुकीसाठी वापरली जात आहेत.

यो वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त, तब्बल १५ ते २० प्रवासी कोंबून भरधाव वेगाने वाहतूक केली जात आहे. वाहनांची अवस्था अत्यंत जीर्ण असून कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडू शकते. मात्र याकडे आरटीओ प्रशासन आणि संबंधित यंत्रणा अर्थपूर्ण दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, आरटीओचे भरारी पथक परिसरात दाखल होताच ही वाहने काही काळासाठी गल्लीबोळात किंवा आडोशाला लपवली जातात. पथक



निघून गेल्यानंतर मात्र पुन्हा हीच भंगार वाहने रस्त्यावर सुसाट धावताना दिसतात. त्यामुळे कारवाई केवळ कागदोपत्रीच होत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या बेकायदेशीर वाहतुकीमुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असून, नियमांचे पालन करणाऱ्या वाहनधारकांवर अन्याय होत आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, काही मोजक्या लोकांच्या फायद्यासाठी सामान्य प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण केला जात आहे. मोठी दुर्घटना घडण्यापूर्वीच संबंधित विभागाने या भंगार वाहनांवर कठोर कारवाई करून प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरू लागली आहे. 'अपघातानंतर कारवाई करण्यापेक्षा अपघात टाळण्यासाठी कारवाई करा,' अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
बुधवार, दि. ३ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# अनुसूचित जाती उपवर्गीकरणाच्या विरोधात बुलढाण्यात आंदोलन

प्रतिनिधी ३ जून

**बुलढाणा :** अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तत्काळ थांबवून संविधानिक हक्कांचे संरक्षण करण्यासाठी बुलढाणा शहरातील समस्त आंबेडकरी जनतेच्या वतीने व चर्मकार बांधवांच्या वतीने आज मंगळवार २ जून रोजी जिल्हाकचेरीवर धडक देत जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना न्याय्य मागण्यांचे निवेदन देण्यात आले. भारतीय संविधानाचे निर्माते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षापासून उपेक्षित असलेल्या वर्गाला अनुसूचित जाती अशी ओळख देऊन संविधानाच्या कलम ३४१ नुसार शैक्षणिक व सामाजिक प्रगती होण्यासाठी आरक्षण दिले आहे. हे आरक्षण देत असताना कोणताही घटक उपेक्षित राहू नये, म्हणून सामाजिक न्यायाच्च्या तत्त्वावर संधीची समानता देण्यात आली आहे. संविधानाच्या कलम १४ नुसार सर्वांना कायद्यासमोर समानता आणि समान संरक्षण दिले आहे. कलम १५ (१) नुसार भेदभाव करण्यास मनाईव १६ (१) नुसार समान संधीचा अधिकार देण्यात आलेला आहे. अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण केल्यास भारतीय संविधानाच्या कलम १४ च्या समानतेच्या तत्वाच्या विरोध होईल. उपवर्गीकरणाच्या माध्यमातून संविधानिक एकात्मतेवर घाव घालू नये. म्हणून अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण तात्काळ थांबून रद्द करण्यात यावे. मा. न्यायमूर्ती बदर समितीमध्ये ५९ जातींच्या प्रतिनिधीचा समावेश नसल्याने ही समिती गैरसंविधानिक आहे, या समितीचा अहवाल सार्वजनिक करून ही समिती रद्द करण्यात यावी. अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाला ५८ जातीचा विरोध आहे, त्यामुळे हे उपवर्गीकरण तात्काळ रद्द करावे, अन्यथा मोठे आंदोलन छेडण्याच्या इशारा देण्यातआला. या आंदोलनामध्ये गट-तट, पक्ष व व्यक्ती निरपेक्ष सर्व समावेशक असे समस्त आंबेडकरी समाज, चर्मकार समाज, वाल्मिकी समाज, खाटीक समाज यांच्या प्रतिनिधीसह महिला, तरुण व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

♦ न्याय्य हक्कांसाठी आंबेडकरी समाज एकवटला; ५८ जातींच्या प्रतिनिधींचा सहभाग



### राज्याला भेद निर्माण करण्याचा अधिकारी नाही

◆कलम १५ (१) आणि १६ (१) नुसार राज्याला जातीनिहाय नवीन भेद निर्माण करण्याचा अधिकार नाही. महाराष्ट्र शासन अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाच्या दिशेने पावले उचलत असून त्यामुळे अनुसूचित जातीसमूहांमध्ये फूट पडू शकते. अनुसूचित जातींना न्याय देण्याऐवजी जाती-जातीत संघर्ष निर्माण करून सामाजिक ऐक्य कमकुवत करण्याचे काम शासनाकडून होऊ नये. सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपण दूर करण्यासाठी शासनाने ठोस धोरण राबवावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

# यंदाच्या खरीप हंगामात पेरणीपूर्वी शेतकऱ्यांनी 'त्रिसूत्री' चा अवलंब करावा ; कृषी विभागाचे आवाहन

प्रतिनिधी ३ जून

♦ पाऊस, बियाणे व हवामान तपासूनच निर्णय घ्या!

**खामगाव :** खरीप हंगामाची चाहूल लागताच शेतकरी पेरणीच्या तयारीला लागले आहेत; मात्र सुरुवातीच्या पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करणे नुकसानकारक ठरू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी काही महत्त्वाच्या बाबींची काळजी घेण्याची गरज असल्याचे कृषी तज्ज्ञांनी सांगितले आहे. योग्य पावसाची खात्री, बियाण्यांची उगवण क्षमता तपासणे आणि अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे व खते खरेदी करणे, ही पेरणीपूर्व महत्त्वाची त्रिसूत्री असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.कृषी तज्ज्ञांच्या मते, परिसरात किमान ८० ते १०० मिलिमीटर समाधानकारक पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी. पहिल्या किंवा दुसऱ्या पावसानंतर घाईघाईने पेरणी केल्यास जमिनीत आवश्यक ओलावा उपलब्ध होत नाही. परिणामी, बियाण्यांची उगवण कमी होणे, बियाणे खराब होणे किंवा दुबार पेरणीची वेळ येण्याची शक्यता वाढते.

**उगवण क्षमता तपासावी!**

बाजारातून खरेदी केलेले अथवा घरात साठवून ठेवलेले बियाणे थेट पेरणीसाठी वापरण्याऐवजी त्यांची उगवण क्षमता तपासणे आवश्यक आहे. साध्या पद्धतीने घरीही उगवण चाचणी घेता येते. यामुळे निकृष्ट किंवा कमी उगवण क्षमता बियाण्यांचा वापर टाळून संभाव्य आर्थिक नुकसान रोखता येऊ शकते.

**हवामान व बियाण्यांची गुणवत्ता तपासूनच निर्णय घ्या!**

घाईघाईत केलेली पेरणी आणि बोगस बियाण्यांचा वापर संपूर्ण हंगाम धोक्यात आणू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी संयम राखून हवामान, जमिनीतील ओलावा आणि बियाण्यांची गुणवत्ता यांचा विचार करूनच पेरणीचा निर्णय घ्यावा, असे आवाहन कृषितज्ज्ञांनी केले आहे.

दरवर्षी बोगस बियाणे आणि निकृष्ट कृषी निविष्ठांमुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याच्या तक्रारी समोर येतात. त्यामुळे बियाणे व खते केवळ अधिकृत आणि परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. तसेच खरेदीवेळी पक्के बिल, बियाण्यांचा लॉट क्रमांक आणि संबंधित पावत्या सुरक्षित जतन करून ठेवाव्यात, असेही आवाहन करण्यात आले आहे. वादळी पावसासोबत अनेक ठिकाणी विजांचा कडकडाट होतो. अशावेळी नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याची गरज आहे. विजांच्या कडकडाटाच्या वेळी झाडाखाली, टिनशेडखाली किंवा उघड्या जागेत थांबणे टाळावे. तसेच वीज खांब, ट्रान्सफॉर्मर आणी विद्युतवाहिन्यांपासून सुरक्षित अंतर राखावे. शेतात काम करत असलेल्या शेतकऱ्यांनी तसेच नागरिकांनी तातडीने सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा.

# जूनच्या पहिल्या आठवड्यात मे हिट कायमच बोरवेल विहिरींनी तळ गाठल्याने शेतकरी अडचणीत

प्रतिनिधी ३ जून

**उदयनगर :** उन्हाळ्याचा कडाका आणि लांबीवर पडलेला पावसामुळे उदयनगर परिसरातील शेतातून पिकांचे उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यावर पाणीटंचाईचे संकट गडद झाले असून जूनच्या पहिल्या आठवड्यात मे हिट कायमच असून अनेक बोरवेल विहिरींनी तळ गाठल्याने कारले उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहेत.गेल्या काही वर्षा पासून उदयनगर अमडापुर परिसरातील शेतकरी बांधव कारले पिकांकडे वळले असून कमी जागेत चांगले उत्पादन होत असल्याने बहुतांश शेतकरी कारले पिकाकडे वळले आहेत या वर्षी परिसरात जवळपास २०० ते ३०० शेतकऱ्यांनी कारले पिकाची लागवड केल्याची माहिती असून मागील वर्षी या भागातील शेतकऱ्यांना कारले पिकाचे उत्पन्न चांगल्यापैकी झाल्याने यावर्षी उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्याही वाढलेली आहे.

गेल्या एक ते दीड महिन्यापूर्वी कारले वेलाची लागवड केलेली आहे विहीर बोरवेल मधून पाणी देणे सुरू आहे. परंतु उष्णतामान ४० ते ४१ अंश सेल्सिअस पर्यंत असून अनेक विहिरीं बोरवेलने तळ गाठला आहे याला मात्र काही शेतकरी परिसरात अपवाद आहेत त्यांच्याकडे पाण्याची व्यवस्था आहे मागील वर्षी १५ मे दरम्यान अवकाळी पाऊस पडला होता यावर्षी दोन २ उजाडला तरी अवकाळी पावसाचे आगमन झालेले नसल्याने वैरागड परिसरात काही कारले उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतातील कारले मंडपावरील वेल जगवितांना पाणी विकत घेऊन कारले वेल जगवावे लागत आहेत. तर दुपारी उष्णतामान अधिक राहत असल्याने दुपारच्या सुमारास कारले वेल उन धरत आहेत कारले बियाणे, खत, मंडप उभारणी खर्च, औषध फवारणीसाठी झालेला मोठा खर्च हे यावर्षी वसूल होईल की नाही अशी भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत तर काही शेतकरी कारले पीक वाचवण्यासाठी महागड्या दराने खाजगी टँकरने पाणी विकत घेत आहेत त्यामुळे उत्पादन खर्च आणखीनच वाढत आहे. करिता परिसरातील कारले उत्पन्न घेणारे शेतकरी पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहत आहेत ऐवढे मात्र खरे !

# बोदवड चौफुलीजवळ शिवसेनेसह वाकोडी ग्रामस्थांचे 'रास्ता रोको' आंदोलन!

प्रतिनिधी ३ जून

♦ प्रशासनाच्या ढिम्म कारभाराविरोधात नागरिकांचा एल्गार




**मलकापुर:** पावसाळा तोंडावर आलेला असतानाही प्रशासनाला आलेली 'सुस्ती' आणि नागरिकांच्या जिवाशी चाललेला खेळ याच्या विरोधात आज मलकापूरमध्ये संतापाचा प्रचंड उद्रेक झाला. दिलेला ५ दिवसांचा अल्टिमेटम संपताच, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांच्या नेतृत्वाखाली आज, ३ जून रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता बुलढाणा रोडवरील बोदवड चौफुलीजवळ हजारो महिला व ग्रामस्थांनी रस्त्यावर उतरून तीव्र 'रास्ता रोको' आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनामुळे बुलढाणा रस्त्यावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली असून, परिसरात प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरवर्षीची 'जलसमाधी' आणि प्रशासनाचा ढिम्मपणा! बुलढाणा रोडने दाताळ्याकडून येणारे पावसाचे पाणी रस्त्यालगतच्या नाल्या खोल नसल्यामुळे दरवर्षी थेट ग्रामस्थांच्या घरात शिरते. तुलसी नगर, शिवशक्ती नगर, नालंदा नगर, वृंदावन नगर भाग १,२,३,४ हनुमान नगर, आनंद सोसायटी,हरीकीरण सोसायटी, गोपाळ कृष्ण नगर यासह तब्बल डझनभर सोसायट्यांमध्ये कमरेपर्यंत (३-३ फूट) पाणी साचते. ग्रामस्थांचा सवाल: 'दरवर्षी आमचा संसार पाण्यात वाहून जातो, वाहने खराब होतात, विहिरी-बोअरवेल दूषित होतात. साचलेल्या पाण्यात साप आणि विंचवांचा वावर वाढल्याने आमच्या मुलाबाळांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. तरीही प्रशासन सुस्त का?' वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाने डोळे झाकून घेतल्यामुळेच आज नागरिकांना रस्त्यावर उतरावे लागले आहे. प्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू असून, 'आता आश्वासन नको, थेट काम हवे!' अशी भूमिका आंदोलकांनी घेतली आहे. आंदोलनस्थळी पोलिसांचा मोठा ताफा तैनात करण्यात आला असून, या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या कोणत्याही कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीला केवळ आणि केवळ मलकापूरचे तहसीलदार आणि स्थानिक प्रशासन जबाबदार राहील, असा संतप्त इशारा ग्रामस्थांनी दिल्यानंतर व बुलढाणा रोड वरील रास्तारोको आंदोलनंतर जागे झालेल्या तहसीलदार समाधान सोनवणे यांनी त्यांच्या दालनात , तलाठी, मंडळ अधिकारी,वाकोडी ग्रामसेवक,सां.बा विभाग अभियंता सह आदिं संबंधितांची बैठक बोलावून संबंधित अधिकाऱ्यांना दोन दिवसात स्तरावर काम करून बुलढाणा रोडचे पाणी नळगंगा नदीपात्रात काढण्याचे सांगितले यावेळी उपस्थित ग्रामस्थांच्या वतीने शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांनी दोन दिवसात जर प्रश्न मार्गी लागला नाही तर यापेक्षाही त्रिव आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# भीषण अपघात १ ठार, १ जखमी

प्रतिनिधी ३ जून

**चिखली :** शहरालगतच्या बुलढाणा रोडवरील दांडगे पेट्रोल पंपाजवळ सोमवारी १ जूनच्या रात्री सुमारे ७.३० वाजेच्या सुमारास मोटारसायकल व वॅगनार कारमध्ये झालेल्या भीषण अपघातात एका युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा युवक गंभीर जखमी झाला. मिळालेल्या माहितीनुसार, अक्षय कुलसुंदर व गोलू गवारे हे दोघे मोटारसायकल क्र. एमएच-२८ बीएक्स-२७८६ वरून बुलढाण्याकडून चिखलीकडे येत होते. दरम्यान, दांडगे पेट्रोल पंपाजवळ त्यांची मोटारसायकल व कार क्र. एमएच-४९ बीबी-६३४६ यांच्यात अपघात झाला. ही धडक इतकी जबरदस्त होती की मोटरसायकलचे काही भाग तुटून विखुरले गेले. या भीषण अपघातात अक्षय कुलसुंदर याचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर गोलू गवारे हा जखमी झाला असून त्याच्यावर जे जे प्लस हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरू आहेत. मृत व जखमी दोघेही चिखली शहरातील राऊतवाडी परिसरातील रहिवासी आहेत. घटनेची माहिती मिळताच चिखली पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून पुढील तपास व कायदेशीर कारवाई सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. अचानक घडलेल्या या घटनेमुळे परिसरात शोककळा आहे.

# जनुना येथे पुरुषोत्तम मासनिमित्त राम कथा व अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय वातावरणात सांगता

प्रतिनिधी ३ जून

**खामगाव :** शहरापासुन जवळच असलेल्या ग्राम जनुना येथे पुरुषोत्तम मासानिमित्त राम कथा व अखंड हरिनाम सप्ताह व श्री संत गजानन महाराज पारायणाचे आयोजन करण्यात आले होते.या सप्ताहाला रविवार दि.२४ मे २०२६ पासुन प्रारंभ झाला होता.यानिमित्त जनुना येथील हनुमान मंदिर परिसरात दररोज विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

पहाटे काकडा आरती, विष्णुसहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ तसेच रात्री ८.३० ते १०.३० हरि कीर्तन कार्यक्रम पार पडले. या सप्ताहा दरम्यान विविध भागातून आलेल्या नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार व महाराजांनी आपल्या प्रभावी वाणीमधून भक्तांना अध्यात्म, संस्कार आणि समाजप्रबोधनाचा संदेश दिला.कथावाचक हभप संतदास गिरी महाराज तोरनाळा यांच्या अमृत वाणीतून राम कथेचे वाचन करण्यात आले. या



रामकथा व अखंड हरिनाम सप्ताहाची रविवार दि.३१ मे २०२६ रोजी भक्तीमय वातावरणामध्ये उत्साहात सांगता झाली. याप्रसंगी हभप संतदास गिरी महाराज तोरनाळा यांचे सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत काल्याचे किर्तन पार पडले.याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी या राम कथा व अखंड हरिनाम श्रीमद्?? भागवत सप्ताहाला भेट देवुन ग्रंथ पुजन केले तसेच हनुमान मंदिरामध्ये पुजा अर्चा करुन दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेसचे खामगाव शहर अध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने,तालुकाध्यक्ष मनोज वानखडे,कार्याध्यक्ष केशव कापले आदी उपस्थित होते.यावेळी आयोजकांच्या वतीने माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांचा शेला-टोपी देवुन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जनुना ग्राम पंचायतचे माजी सरपंच अमोल गोरे, माजी ग्राम पंचायत सदस्य प्रकाश कोंडे,तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष पुरुषोत्तम कोळसे,राजुआप्पा गोरे, विकास हरमकार,प्रकाश हरमकार, गोविंदराव कोळसे,नाना भुसारी महाराज, श्रीकृष्ण हरमकार, अंबादास बुंदे,नितीन कोळसे, श्री संत गजानन महाराज महिला भजनी मंडळाच्या अनुसयाबाई कोळसे,विमलताई बुंदे आदी उपस्थित होते.काल्याच्या किर्तनानंतर भव्य महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या महाप्रसादाचा माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्यासह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी लाभ घेतला.सायंकाळी ४ वाजता दिंडी पताकासह गावातुन भव्य मिरवणुक काढुन या राम कथा व अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता झाली.दिंडीत महिला, युवक, नागरिक आणि वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी जनुना येथील गावातील समस्त नागरिक व महिला मंडळ,पुरुष मंडळी तसेच तारकेश्वर मित्र मंडळ,श्री गजानन महाराज सेवाधारी महिला मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# १.४१ लाख स्मार्ट मीटर; ग्राहकांना प्रतियुनिट ८५ पैशांची सवलत!

प्रतिनिधी ३ जून

♦ अचूक बिलिंगमुळे तक्रारींमध्ये घट

**खामगाव :** अकोला परिमंडळातील बुलढाणा जिल्ह्यात महावितरणने आतापर्यंत १ लाख ४१ हजार ६१२ स्मार्ट टाईम ऑफ डे मीटर बसविले असून, नव्या वीजजोडण्यांसाठी आणखी ३२ हजार १७१ स्मार्ट मीटर देण्यात आले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित या मीटरमुळे ग्राहकांना अचूक बिलिंग, वीज वापरावर नियंत्रण आणि आर्थिक बचतीचा लाभ होत असल्याचा दावा महावितरणने केला आहे. महावितरणने दिलेल्या माहितीनुसार, स्मार्ट मीटरमध्ये वीज वापराचे वाचन पूर्णपणे स्वयंचलित पद्धतीने होत असल्याने मानवी हस्तक्षेपाची गरज राहत नाही. परिणामी, सरासरी बिल, रीडिंगमधील त्रुटी किंवा -दोषपूर्ण मीटर यांसारख्या तक्रारींमध्ये घट झाली आहे.स्मार्ट मीटरधारक ग्राहकांसाठी 'टाईम ऑफ डे' योजनेअंतर्गत सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या कालावधीत वापरलेल्या विजेवर सवलत दिली जात आहे. जुलै २०२५ मध्ये सुरू झालेली प्रति युनिट ८० पैशांची सवलत एप्रिल २०२६ पासून वाढवून ८५ पैसे प्रति युनिट करण्यात आली आहे. त्यामुळे दिवसा वीज वापरणाऱ्या ग्राहकांच्या मासिक वीज बिलात बचत होत आहे. स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना मोबाईल ॲपच्या माध्यमातून तासागणिक वीज वापराची माहिती उपलब्ध होत असून, त्यानुसार वीज वापराचे नियोजन करणे शक्य होत आहे. महावितरणने स्पष्ट केले आहे की, स्मार्ट मीटरमुळे वीज बिल वाढत नाही. हे मीटर केवळ वापरलेल्या विजेचे अचूक मोजमाप करते.

# गिट्टी खदानवरुन अँगलचे तुकडे चोरी; अज्ञाताविरुध्द गुन्हा

प्रतिनिधी ३ जून

**खामगाव :** तालुक्यातील घाटपुरी शिवारातील गिट्टी खदानीतून बांधकामासाठी वापरण्यात येणारे लोखंडी अँगलचे तुकडे चोरीस गेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. सुटाळपुरा, खामगाव येथील रहिवासी सागर राजेंद्र काळे वय ४५ यांनी याबाबत तक्रार दिली आहे. काळे यांची पिंपळगाव रोडलगत घाटपुरी शिवारात गिट्टी खदान असून तेथे बांधकामाचे काम सुरू आहे. बांधकामादरम्यान उरलेले नवीन लोखंडी अँगलचे तुकडे खदान परिसराच्या बाहेर एकत्र करून ठेवण्यात आले होते. ३० मे रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास फिर्यादी व त्यांचा भाऊ खदान परिसराची पाहणी करण्यासाठी गेले असता, तेथे ठेवलेले लोखंडी अँगलचे तुकडे गायब असल्याचे निदर्शनास आले.अज्ञात चोरट्याने सुमारे ९० किलो वजनाचे लोखंडी अँगलचे तुकडे चोरून नेल्याचे स्पष्ट झाले. चोरीस गेलेल्या मालाची किंमत प्रतिकिलो ६० रुपये दराने अंदाजे ५ हजार ४०० रुपये असल्याचे सांगण्यात आले.

# अंधश्रद्धेची राख करून, स्मशानभूमीत स्वच्छतेचा इतिहास घडवला!

प्रतिनिधी ३ जून



**खामगाव :** पर्यावरण दिनानिमित्त आयोजित हरित नवयुवा सप्ताह सोहळ्याअंतर्गत आज खामगाव शहरातील स्मशानभूमी परिसरात मुलींच्या सहभागातून विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. अंधश्रद्धा, भीती आणि सामाजिक गैरसमजांना बाजूला सारत मुलींनी स्मशानभूमीत प्रत्यक्ष श्रमदान करून स्वच्छतेचा आदर्श निर्माण केला.नव संकल्प फाउंडेशनच्या पुढाकाराने आयोजित या उपक्रमात शहरातील युवती व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. स्मशानभूमी परिसरातील कचरा, प्लास्टिक व इतर टाकाऊ वस्तू गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला. यावेळी सहभागी मुलींनी समाजात रूढ असलेल्या अंधश्रद्धांना न जुमानता सामाजिक जबाबदारीचे भान जपत स्वच्छतेचा संदेश दिला. स्मशानभूमी हे केवळ भीतीचे किंवा अंधश्रद्धांचे केंद्र नसून ते देखील समाजाचा एक महत्त्वाचा भाग असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आले. मुलींच्या या धाडसी आणि सकारात्मक सहभागाचे नागरिकांनी कौतुक केले. नव संकल्प फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, हरित नवयुवा सप्ताहाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, सामाजिक जनजागृती आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. आजचा उपक्रम हा खामगावच्या सामाजिक इतिहासातील एक प्रेरणादायी उपक्रम ठरला असून यामुळे महिलांच्या सामाजिक सहभागाला नवी दिशा मिळाली आहे. या अभियानात वैष्णवी गोलाईत, शारदा इंगळे, आकांक्षा घेवंदे, पायल हेलोडे, सृष्टी श्रीवास्तव, अनुष्का वखरे आणि नंदिनी मुंग्यालकर या युवतींनी सक्रिय सहभाग नोंदविला. तसेच फाउंडेशनचे पदाधिकारी, सदस्य, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपक्रमाच्या शेवटी सर्वांनी स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि अंधश्रद्धा निर्मूलनाची सामूहिक शपथ घेतली.

# मोफत कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी अर्जाचे आवाहन

प्रतिनिधी ३ जून

**बुलढाणा :** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (AMRUT), पुणे आणि इंडो जर्मन टूल रूम (घ्उऊं), औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने खुल्या प्रवर्गातील लक्षित गटातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल युवक-युवतींसाठी रोजगाराभिमुख मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत दहावी उत्तीर्ण, आयटीआय, डिप्लोमा व पदवीधर युवक युवतींना उद्योगाभिमुख तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे.

CNC Technology, CAD/CAM Design, AutoCAD, SolidWorks, CATIA, PLC Programming, Robotics & Automation तसेच शर्म्र्दिहग्म यांसारख्या आधुनिक व रोजगारक्षम अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना निवास व भोजनाची सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच उद्योगमान्य अभ्यासक्रमांद्वारे आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देऊन रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा उद्देश याउपक्रमामागे आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
बुधवार, दि. ३ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# ओव्हर क्राऊडेड स्विमिंग पुलसाठी नवा पर्याय तयार


**उन्हाळा संपल्यावर नव्या स्विमिंग पुलचे होणार उदघाटन**

प्रतिनिधी ३ जून

**अकोला :** अकोल्यातील कडक उन्हाळ्यातील गारवा हा स्विंमग पुलमध्ये पोहल्यावरच मिळतो. पण, क्रीडा संकूलातील एकाच स्विंमग पुलमध्ये किती लोकांनी पोहावे हा प्रश्न अनुत्तरीत आहे. असे असताना नवा स्विमिंग पुल तयार असताना तो उन्हाळ्यात खुला का गेला नाही असा प्रश्न आता विचारला जात आहे.

अकोल्यातील हॉट वातावरणात स्विंमगचा गारवा अनेकांसाठी उत्साह निर्माण करणार असतो. शहरातील जिल्हा क्रीडा संकुलातील जुना स्विमिंग पूल सध्या 'ओव्हर क्राऊडेड' म्हणजेच गर्दीने तुडुंब भरला आहे. पाय ठेवायला जागा नाही, अशी तिथे अवस्था. या गर्दीला उत्तम पर्याय म्हणून शेजारीच कोट्यवधी रुपये खर्च करून एक नवा, प्रशस्त स्विमिंग पूल उभारण्यात आला आहे. पण, अकोलेकरांचे दुर्दैव असे की, हा कोट्यवधींचा पूल उन्हाळ्यात पूर्ण तयार असूनही केवळ 'उद्घाटनाच्या' प्रतीक्षेत कुलूपबंद आहे. आता उन्हाळा संपत आला आहे, पावसाचे ढग जमायला लागले आहेत आणि अशा वेळी प्रशासनाला या पुलाच्या उद्घाटनाची आठवण येत आहे. उन्हाळ्यात ज्या पाण्याची सर्वाधिक गरज होती, तेव्हा अकोलेकरांना तिथे फिरकूही दिले गेले नाही. 'पाणी तयार आहे, पूल चकाचक आहे, मग अडचण कुठे आहे?' असा प्रश्न विचारला जात आहे. पण या किरकोळ तांत्रिक कारणांमुळे आणि नेत्यांच्या उद्घाटनाच्या तारखेअभावी शहरातील शेकडो हौशी पोहणारे आणि व्यावसायिक खेळाडू मात्र ताटकळत राहिले. जुन्या पुलावर क्षमतेपेक्षा जास्त गर्दी होत असल्याने खेळाडू सराव करू शकत नव्हते. उन्हाळा संपल्यानंतर, पावसाळ्याच्या तोंडावर नेत्यांच्या हस्ते या पुलाची फीत कापली जाईल आता या बातमीने हिवाळ्यात फित कापण्याचा उद्योग असेल.





# नेत्यांच्या आश्वासनाचे अनेक झाले नाट्य प्रयोग

**◆ सांस्कृतिक भवनात नटराजाचे आगमन केव्हा**

प्रतिनिधी ३ जून

**अकोला :** अकोल्यात नवे सांस्कृतिक भवन होत आहे. असे आपण गेली अनेक वर्षे राजकीय नेत्यांच्या तोंडून ऐकले. पण, आतून हे सांस्कृतिक भवन कसे आहे चला पाहूया आणि हो किती काम सांस्कृतिक भवनाचे बाकी आहे.

शहरातील रामदास पेठ भागात उभारण्यात येत असलेले बहुप्रतीक्षित सांस्कृतिक भवन आता अखेर तयार होण्याच्या उंबरठ्यावर आले आहे. यामुळे शहरातील नाट्य आणि कलाप्रेमी नागरिकांमध्ये कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. मात्र, 'हे भवन सर्वसामान्य जनतेसाठी कधी खुले होणार?' हा मुख्य प्रश्न अजूनही अनुत्तरितच असल्याने नागरिकांचा जीव टांगणीला लागला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अकोलेकर एका सुसज्ज सांस्कृतिक भवनाची वाट पाहत आहेत. इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आले असले, तरी आतली आसन व्यवस्था अद्याप अपूर्ण असल्याचे चित्र आहे. त्यामुळे काम पूर्ण होऊनही प्रत्यक्ष उद्घाटनाला खीळ बसली आहे. ठेकेदार आणि यंत्रणेत समन्वय नसल्याने हे सांस्कृतिक भवन तयार होण्यास अनेक वर्षांचा कालावधी लागला आहे. निवडणुका आणि विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने स्थानिक नेत्यांनी हे भवन लवकरच जनतेच्या सेवेत रुजू होईल, अशी अनेक आश्वासने दिली होती. मात्र, अद्यापही हे काम रखडलेले पाहायला मिळत असल्याने 'नेत्यांच्या आश्वासनांची पूर्तता कधी होणार?' असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. स्थानिक कलाकार आणि नाट्यप्रेमींनी देखील या सांस्कृतिक भवनाची आशा सोडल्याचे चित्र आहे.







# अकोलेकरांच्या करांवर 'भाड्याच्या' गाड्यांतून ऐश !

प्रतिनिधी ३ जून

**अकोला :** सामान्य अकोलेकर नागरिक सध्या कंबरतोड महागाई आणि गगनाला भिडलेल्या इंधन दरवाढीने होरपळत आहे. अशा वेळी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री सातत्याने 'इंधन बचती'चे धडे देत आहेत. मात्र, अकोल्याचे कारभारी या नियमांना आणि आवाहनांना सपशेल हरताळ फासत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

वरिष्ठ नेत्यांचे ऐकतील ते अकोल्याचे लोकप्रतिनिधी कुठले ? असा टोला आता स्वपक्षीय नेतेच लगावत आहे. स्वतःचा बडेजाव मिरवण्यासाठी महापौरांनी इंधन बचतीच्या धड्यांवर चक्क पाणी फेरले आहे. जनतेच्या करातून जमा झालेल्या पैशांवर नेत्यांची 'भाड्याच्या' फोर व्हिलरमधून ऐश सुरूच असल्याचे उघड झाले आहे. अकोला शहराचा भूगोल पाहिला तर हे शहर अवघ्या ४ ते ५ किलोमीटरच्या परिघाचे (सर्कल) आहे. टू-व्हीलर किंवा साध्या वाहनानेही संपूर्ण शहर काही मिनिटांत पिंजून काढता येते. असे असतानाही महापौरांसाठी दरमहा हजारो रुपयांचे भाडे मोजून आलिशान फोर व्हिलर तैनात ठेवण्यात आली आहे. अकोलेकर खड्डेमय रस्ते, पिण्याचे पाणी आणि कचऱ्याच्या समस्येसाठी पालिकेला कर भरतात. पण त्या पैशातून लोकप्रतिनिधींचे व्हीआयपी चोचले पुरवले जात आहेत. एकीकडे भाजपचे केंद्रीय नेतृत्व इंधन बचतीचा प्रचार करते, तर दुसरीकडे अकोल्यातील भाजपचेच कारभारी त्या आवाहनाची जाहीर ऐशीतैशी करत आहेत. सर्वात दुर्दैवी बाब म्हणजे, एरवी प्रत्येक छोट्या-मोठ्या गोष्टीवर आंदोलन करणारे आणि नैतिकता शिकवणारे भाजपचे स्थानिक नेते या 'भाड्याच्या गाडी'च्या उधळपट्टीवर संपूर्णपणे गप्प आहेत. या उधळपट्टीवर पालिका आयुक्त किंवा प्रशासन लगाम का लावत नाही? हा अकोल्यातील सर्वात मोठा ज्वलंत प्रश्न बनला आहे. या विषयावर आम्ही महापौरांची प्रतिक्रिया घेण्याचा प्रयत्न केला असता त्या उपलब्ध झाल्या नाहीत.



# नवीन शिधापत्रिकाधारक अद्यापही रेशनच्या धान्यापासून वंचित

प्रतिनिधी ३ जून

**अकोला :** केंद्र शासनाने आणखी पाच वर्षे पर्यंत राज्यातील गरीब जनतेला मोफत धान्य देण्याचा निर्णय घेतला. आहे ज्यात प्रामुख्याने अंत्योदय, प्राधान्य गट, तसेच दारिद्र रेषेखालील परिवारांना या धान्याचा लाभ मिळणार आहे. परंतु या योजनेपासून नवीन राशन कार्ड घेतलेले नागरिक मात्र वंचित झाल्याचे दिसून येत आहे. गेल्या वर्षभरात अकोला जिल्ह्यात तयार झालेल्या हजारो नवीन शिधापत्रिका धारकांना अद्यापही शासकीय धान्य योजनेचा लाभ मिळालेला नाही. गरीब आणि गरजू कुटुंबांना परवडणारे अन्नधान्य पुरवणाऱ्या या महत्वकांक्षी योजनेच्या लाभापासून हजारो पात्र कुटुंबे वंचित आहेत. त्यामुळे जनतेमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी पसरली आहे.




## गरिबांना लाभ मिळत नाही

शहर व ग्रामीण पुरवठा विभागाने नवीन शिधापत्रिका जारी केल्या होत्या. यामध्ये मजूर, शेतकरी, आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांचा मोठ्या संख्येने समावेश आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक सदस्याला पाच किलो धान्य मिळणे अपेक्षित होते. परंतु आतापर्यंत एकाही नवीन शिधापत्रिका धारकाला शिधा मिळालेला नाही.

## सरकारकडे मागणी करण्यात आली आहे

नवीन शिधापत्रिका धारकांची संख्या मोठ्या संख्येने असून सरकारकडे धान्याची मागणी पाठविण्यात आली आहे या लाभार्थ्यांना गेल्या वर्षभरापासून रेशनचे धान्य मिळालेले नाही हे पुरवठा विभागाने मान्य केल नवीन राशन कार्ड काढलेले नागरिक त्यांना रेशनचे धान्य कधी मिळेल याबद्दल पुरवठा विभागाकडे सतत चौकशी करत आहेत परंतु त्यांना स्पष्ट उत्तर मिळत नाही. यामुळे लोकांमध्ये असंतोष वाढत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की गरीब कुटुंबांना या योजनेपासून वंचित ठेवल्याने सरकारच्या कल्याणकारी कार्यक्रमावरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

# समृध्दी महामार्ग विकास केंद्रांमागील हवाई सर्वेक्षण !

प्रतिनिधी ३ जून

**सिंदखेडराजा :** सिंदखेड राजा परिसरात मंगळवारी सकाळी ८:४५ ते ९:३५ या वेळेत दिसलेल्या चार्टर विमानाच्या हालचालींमागील कारण स्पष्ट झाले आहे. पश्चिमेकडून पूर्वेकडे वारंवार घिरट्या घालणाऱ्या या विमानाद्वारे महामार्गावरील समृद्धी इंटरचेंज परिसरात प्रस्तावित विकास केंद्रांच्या नियोजनासाठी हवाई सर्वेक्षण करण्यात येत होते. त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम आता दूर झाला आहे. समृद्धी महामार्गहा राज्याच्या आर्थिक विकासाला गती देणारा महत्त्वपूर्ण पायाभूत प्रकल्प मानला जातो. या महामार्गालगत प्रत्येक इंटरचेंजच्या ५ किलोमीटर परिघात औद्योगिक, व्यावसायिक आणि सेवा क्षेत्राशी संबंधित विकास केंद्रे उभारण्याचा प्रस्ताव पुढे येत आहे. या केंद्रांमुळे स्थानिक

**◆ नागरिकांचा संभ्रम दूर**

रोजगारनिर्मिती, गुंतवणूक आणि पायाभूत सुविधांचा समतोल विकास होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, अशा मोठ्या प्रकल्पांच्या प्रारंभिक टप्प्यात अचानक दिसणाऱ्या हवाई हालचाली आणि तांत्रिक सर्वेक्षणामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे अशा उपक्रमांबाबत वेळेत स्पष्ट माहिती देणे आणि स्थानिक पातळीवर संवाद साधणे आवश्यक ठरते. आजच्या माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात कोणतीही अनोखी घडामोड तात्काळ चर्चेचा विषय बनते. त्यामुळे विकास प्रक्रियेत पारदर्शकता आणि जनसंवाद हा विश्वास निर्माण करण्याचा महत्त्वाचा आधार ठरतो. समृद्धी महामार्गासारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात विकास केंद्रांची संकल्पना निश्चितच सकारात्मक पाऊल आहे.

# अकोला रेल्वे स्थानकावर चार महत्त्वाच्या एक्सप्रेस गाड्यांना थांबा द्या

प्रतिनिधी ३ जून

**अकोला :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारच्या वतीने अकोला रेल्वे स्थानकावर अतिरिक्त महत्त्वाच्या गाड्यांना थांबा मिळावा, या मागणीसाठी पक्षाचे प्रदेश संघटक सचिव जावेद जकारिया यांनी अकोल्याचे खासदार अनूप धोत्रे यांना निवेदन सादर केले. यावेळी पक्षाचे महानगराध्यक्ष रफीक सिद्दीकी, सामाजिक कार्यकर्ते इरशाद हुसैन, इमरान सिद्दीकी तसेच सुफियान डोकाडिया उपस्थित होते. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की अकोला हे विदर्भातील एक महत्त्वाचे व्यापारी, शैक्षणिक व सामाजिक केंद्र असून येथून दररोज हजारो प्रवासी देशातील विविध भागांत प्रवास करतात. मात्र, काही महत्त्वाच्या लांब पल्ल्याच्या गाड्यांना अकोला येथे थांबा नसल्यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्या गाड्या नागपूरनंतर थेट भुसावळपर्यंत आणि परतीच्या प्रवासात भुसावळनंतर थेट नागपूरपर्यंत धावतात. या दरम्यान अकोलासारखे महत्त्वाचे रेल्वे स्थानक असूनही या गाड्यांना थांबा नसल्याने विदर्भातील प्रवाशांना त्याचा लाभ मिळत नाही. खासदार अनूप धोत्रे यांनी यापूर्वीही अनेक महत्त्वाच्या रेल्वे गाड्यांना अकोला येथे थांबा मिळवून देण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले आहेत. त्यामुळे अकोला जिल्ह्यातील प्रवाशांची मोठी सोय झाली असून अकोल्याच्या जनतेच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. निवेदन स्वीकारताना खासदार अनूप धोत्रे यांनी या मागणीची सकारात्मक दखल घेत लवकरच रेल्वेमंत्र्यांशी चर्चा करून या विषयाचा पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन दिले.



## मागणी करण्यात आलेल्या गाड्या पुढीलप्रमाणे आहेत

- ◆पुणे - संतरागाछी हमसफर एक्सप्रेस (२०८२१/२०८२२)
- ◆पुरी - गांधीधाम सुपरफास्ट एक्सप्रेस (१२९९३/१२९९४)
- ◆सूरत - संतरागाछी सुपरफास्ट एक्सप्रेस (२२८२७/२२८२८)
- ◆पुणे - हावडा दुरंतो एक्सप्रेस (१२२२१/१२२२२)





# रेल्वे अतिक्रमण कारवाईतील 250 कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी प्रशासन सकारात्मक

**आमदार साजिद खान पठाण यांची जिल्हाधिकाऱ्यांसोबत चर्चा**

प्रतिनिधी ३ जून

**अकोला :** अकोला ऐन मान्सूनच्या तोंडावर रेल्वे प्रशासनाने तारफैल ते नायगाव परिसरात अतिक्रमण हटाव मोहीम राबवत मोठी कारवाई केली. या कारवाईमुळे सुमारे २५० कुटुंबे बेघर झाली असून त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर अकोला पश्चिम मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांनी आज जिल्हाधिकारी वर्षा मीना यांची भेट घेऊन बेघर झालेल्या कुटुंबांच्या पुनर्वसना संदर्भात सविस्तर चर्चा केली. यावेळी जिल्हा प्रशासनातील महानगरपालिकेतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना आमदार साजिद खान पठाण यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी वर्षा मीना आणि इतरही प्रशासन या प्रश्नाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहत बेघर झालेल्या २५० कुटुंबांसाठी योग्य उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले आहे. प्रशासनाकडून पुनर्वसन अथवा पर्यायी निवास व्यवस्थेबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सध्या प्रभावित २५० कुटुंबांची तात्पुरती व्यवस्था परिसरातील सार्वजनिक सभागृहांमध्ये करण्यात आली असून मोहल्ला समित्या, समाजसेवी संस्था तसेच काही नगरसेवक मदतीसाठी पुढे सरसावल्याचे आमदार पठाण यांनी सांगितले. यावेळी त्यांनी जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनातील अधिकारी हे सर्वसामान्य आणि गरीब नागरिकांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील असल्याचे नमूद केले. तसेच रेल्वे अतिक्रमण हटाव कारवाईमुळे प्रभावित झालेल्या कुटुंबांना न्याय मिळावा यासाठी प्रशासन सकारात्मक भूमिका घेईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. भविष्यात ई-क्लास जमीन, गायरान जमीन किंवा अन्य उपलब्ध पर्यायांच्या माध्यमातून या कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी उपाययोजना करण्याबाबत प्रशासन स्तरावर विचार केला जाईल, असेही आमदार साजिद खान पठाण यांनी सांगितले.









हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135